दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार,दि.४ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यातील लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपयांची मदत जमा होण्यास सुरुवात झाल्याने बहिणींच्या चेह-यावर आनंद झळकला असतानाच, महायुती सरकारची मात्र या योजनेला निधी मिळवताना चांगलीच दमछाक होत असल्याचे समोर आले आहे. दोन कोटी लाभार्थींना दरमहा आर्थिक मदत देण्यासाठी सरकारला इतर खात्यांचा निधी वळवावा लागत आहे. लाडकी बहीण योजनेचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला आहे. दोन्ही विभागांचे अनुक्रमे ४१० कोटी ३० लाख आणि ३३५ कोटी ७० लाख रुपये महिला आणि बालविकास विभागाकडे वळविण्यात आले.(शुक्रवारी) यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयानंतर सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आल्याने खात्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त केला आहे. निधी वळवल्याच्या प्रश्नावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, तुमच्या माध्यमातून कळले जवळपास सव्वाचारशे कोटी वर्ग करण्यात आले आहेत, याची मला कल्पना आणि माहिती नाही. सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल तर खाते बंद केले तरी चालेल, असे म्हणत शिरसाटांनी संताप व्यक्त केला आहे.मला याची काहीच कल्पना नाही, याबाबत मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करेन, फायनान्स डिपार्टमेंट आपली मनमानी चालवत आहे, आपण म्हणू तेच खरं म्हणत आहेत. या खात्याचा कायदेशीर निधी वर्ग करता येत नाही, कट करता येत नाही, फायनान्स डिपार्टमेंटवाले आपले डोके जास्त चालवत असतील तर हे बरोबर नाही, हे स्पष्टपणे सांगतो. आदिवासी समाज कल्याण खाते कशासाठी निर्माण झाले आहे? इतर खात्यातून पैसे वर्ग करता येत नाहीत का? हे मला पटलेले नाही, मुख्यमंत्री चर्चा करेल. माझे मागच्या वर्षीचे दायित्व १५०० कोटी रुपयांचे आहे. इतर खात्यांचे वर्ग झाले की काय माहिती नाही. मात्र, सामाजिक खात्याचे पैसे वर्ग झाले हे सत्य आहे, असे म्हणत खात्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त केला आहे.

लाडकी बहिण योजनेसाठी निधी वळविला

मंत्री संजय सिरसाट म्हणाले आमच्यावर अन्याय कशामुळे

अजित पवार जेंव्हा-जेंव्हा सत्तेत तेंव्हा-तेंव्हा वाटोळे

राज्यभरातून सरकारविरोधात तीव्र प्रतिक्रिया

# अर्थमंत्री अजित पवार सामाजिक न्यायचे शत्रू..!

४१० कोटी वर्ग करुन जातीयवादी भूमिका घेतली



## निधी वळवल्याने अंबादास दानवेंचा हल्लाबोल

शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि राज्याच्या विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निधी वळवल्याच्या निर्णयावर हल्लाबोल केला आहे. लाडक्या बहिणीचा हप्ता भरायला सरकारने आदिवासींच्या वाट्याचे पैसे पळवले! सरकारी तिजोरी रिकामी होत चालली आहे! सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासाठी मंजूर ३,९६० कोटींपैकी ४१० कोटी ३० लाख रु. तसेच आदिवासी विकास खात्याला दिलेल्या ३,४२० कोटींच्या सहाय्यक अनुदानातून तब्बल ३३५ कोटी ७० लाख रुपये लाडकी बहीण योजनेसाठी खेचले! अशा प्रकारे आदिवासी विभागाच्या वाट्याचे एकूण ७४६ कोटी रुपये पैसे सरकारने खेचून नेले! नियम : नियोजन आयोगाच्या नियमानुसार, आदिवासी आणि सामाजिक न्याय या दोन खात्यांना दिला जाणारा निधी त्या समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठरतो. हा निधी त्या संवर्गावरच खर्च करणे बंधनकारक असते. तो इतर खात्यांमध्ये वळवता येत नाही, अशी पोस्ट शेअर करत निधी वळवता येत नाही असं सांगत त्यासंबंधीचा नियम देखील दानवेंनी आपल्या पोस्टमध्ये सांगितल आहे.

## खात्याचा निधी इतर ठिकाणी वर्ग करता येत नाही

संजय शिरसाट म्हणाले, माझ्या खात्याचा निधी तुम्हाला इतर ठिकाणी वर्ग करता येत नाही, हा नियम आहे. कायदा आहे. फायनान्समध्ये काही जण बसले आहेत, त्यांना जर आपण हुशार आहोत असे वाटत असेल तर त्यांनी मला हे दाखवले पाहिजे, आणि नियम द्या मला निधी वर्ग करता येतो म्हणून जर करता येत असेल तर मी त्यांची माफी मागेन, लाडकी बहीण लाडकी आहे, फायनान्समध्ये बसलेले शकुनी आहेत, त्यांनी केलेले हे काम आहे, असे म्हणत संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त केला आहे.

## इंजिनिअर कांदेबाईला राजकीय वरदहस्त?

चर्चा:घरकुल विभागात मांडला बाजार




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज :पंचायत समितीच्या घरकुल विभागाला असलेल्या इंजिनिअर कांदे मॅडम मनमानी कारभार करत असल्याचे नागरिकांन मध्ये चर्चा सुरू आहे कारण कारण कांदे या एका घरकुलाला दहा हजार घेतात घरकुल विभागाला असलेले नियम नियमानुसार कांदे मॅडम वागत नाहीत पंचायत समिती या कांदे मॅडमला कंटाळली आहे या कांदे ला केज पंचायत समितीच्या बिडीओ यांचे अभय आहे का कारण केज पंचायत समिती मध्ये काय चाललंय ते जर बिडीओ ला माहीत नाही तर त्या करतात काय यावर वरिष्ठ अधिकारी तुम्हीच त्यांना समज दिली पाहिजे कांदे मॅडम हे वागत बर नव्ह कांदे जर तुम्ही घरकुला साठी दहा हजार घेतात तर सर्व सामान्य लोकांनी करायचं काय आणि घरकुल बांधून नका मला पंधरा हजार द्या मी तुमचे घरकुल पास करुन देते अस बोलता तर मग काय पंचायत समिती मध्ये काय काललय आहेत तसेच नागरिकांचे घरकुलाचे हप्ता आडवा अडवी करणे अशा छोट्या छोट्या कामाला पैसे मागणे अडथळा निर्माण करण्याचे काम केज पंचायत समितीच्या घरकुल विभागाला असलेल्या कांदे तिनं दिवसा पूर्वी तर चक्क कांदे संध्याकाळी ७:३० ते ८वासता घरकुल पाहनी करण्यासाठी एका गावात जाता आणि पैसे मागता आणि पैसे नाही दिले की लोकांचे फोन पण उचलत नाही तसेच त्यांना कोणी काही बोललं तर अरेरावी करतात अधिकारी आहेत पान २ वर

## आडसकर तुम्ही समाजाचा विश्वास गमावला!

राजकीय:केज तालुक्यात रंगतेय भलतीच चर्चा

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज : तालुक्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते म्हणून ओळख असलेल्या रमेशराव आडसकर यांनी मागील काही दीवसापुर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात प्रवेश केला आहे परंतु आडसकर यांच्या प्रवेशानंतर केज तालुक्यात वेगळेच चर्चा सत्र सुरू झाले आहे कारण रमेश आडसकर यांनी



चुकीच्या व गुंडांना पोसणाऱ्या टोळीच्या पक्षात प्रवेश केला आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे तसेच आडसकर यांनी अशा टोळीच्या मुकादमाच्या पक्षात प्रवेश केला आहे की ज्यांनी स्वर्गीय संतोष देशमुख यांचा घात केला आहे अशा टोळीच्या पक्षात प्रवेश केला आहे त्यामुळे रमेश आडसकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पान २ वर

## बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करावी

पप्पु कागदे:डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रचलित धर्माचा अभ्यास केला होता. त्या धर्मामध्ये बौद्ध धम्माने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रभावित केले होते. बुद्ध धम्मात जाती-भेद-उच्च-निच अस्पृश्यतेला थारा नव्हता. या धम्मात सर्व मानव समान आहेत. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जरी जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी घोषणा करुन १४ आक्टोबर १९५६ साली नागपुरात बुद्ध धम्माची दिक्षा घेऊन तथागताच्या बुद्ध धम्माचा स्वीकार केला. तथागताच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी मांजरसुंबा, जरूड, आंबे सावळी, म्हाळसापूर, जवळा, आहेर चिंचोली येथे केले.



पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, धर्म हा केवळ कायदा किंवा आज्ञा नसाव्यात. ज्या क्षणी धर्माचे रूपांतर कायद्यात होते, त्या क्षणाला तो धर्म भष्ट्र होतो. खऱ्या अर्थाने धर्म धार्मिक संकल्पनेचा गुणच मारुन टाकतो. जीवन व वास्तव यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण आणि विचारात बदल करणे म्हणजेच धर्मांतर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. म्हणूनच दया, क्षमा, शांती व करुणेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धाच्या धम्माची नागपूर मुक्कामी लाखो अनुयायांना सोबत घेऊन दिक्षा घेऊन सारा भारत बुद्धमय करण्याचा पान २ वर

जयभिम उत्सव

हर्षवर्धन सपकाळ:परळीत काँग्रेसची सदभावना सत्याग्रह यात्रा

## सदभावनेची मशाल तेवत राहिली पाहिजे

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: दिवसेंदिवस बिघडत चाललेला सामाजिक व जातीय सलोखा अबाधित राहावा या उद्देशाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने मागच्या काही दिवसांपासून सद्भावना अभियान सुरू करण्यात आलेले आहे. आणि त्याच अनुषंगाने परळी मध्ये सुमारे चार तास सद्भावना सत्याग्रह करून सद्भावना वाढीसाठी प्रयत्न करण्यात आले.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या संकल्पनेतून वाढत चाललेल्या सामाजिक व जातीय प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्रात सद्भावना वाढणे गरजेचे असल्याची संकल्पना मांडली. आणि त्यानुसार सद्भावना अभियानांतर्गत मागच्या




कांही दिवसांपूर्वी मस्साजोग ते बीड पायी रॅली काढण्यात आली होती, आणि प्रतिसादही उत्स्फूर्त मिळाला होता.

तर दुसऱ्या टप्प्यात परळी वैजनाथ येथे सद्भावना सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे नियोजन खा.रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, युवानेते आदित्य पाटील,उपाध्यक्ष ऍड. प्रकाश मुंडे, शहराध्यक्ष बहादूर भाई तसेच काँग्रेसच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी केले. शनिवार दिनांक ३ मे रोजी परळी शहरातील मोंढा मैदान येथे सदरील सदभावना सत्याग्रहाचे आयोजन सकाळी दहा वाजता करण्यात एके होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांना अभिवादन करून वंदे मातरम ने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आणि यावेळी पहलगाम येथे निष्पापणे बळी गेलेल्या भारतीय नागरिकांना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली. यानंतर सुमारे चार तास अतिशय शांततेमध्ये सत्याग्रह सुरू करण्यात आला. यावेळी पान २ वर

## मागच्या दराने सर्रास दारु विक्री

बोंबला:चिंचोली माळी येथील प्रकार




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज :तालुक्यातील चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही करण्यात येत नाही पोलीस प्रशासन कार्यवाही केली परंतु कार्यवाही करुन सुध्दा चिंचोली माळी येथील शिवातील तलाठी कार्यालय समोरील, महावितरण केंद्रा समोरील, छत्रपती संभाजी महाराज चौक,सारुकवाडी मंगल कार्यालया समोर चिंचोली माळी येथील धाबे खुलेआम अवैध दारू विक्री सुरु पान २ वर

## युद्ध ‘खेळून’ पाहिल्यानंतर

व्हिएतनाम युद्धात अमेरिकेची मानहानी झाली. व्हिएतनाम मोठे नुकसान सोसूनही सावरला. कथानके रचून विजय मिळत नाही, हेही दिसले थोडेथोडके नाही, ३० लाखांहून अधिक नागरिक मृत्युमुखी त्याहून कित्येक जणांच्या तनावर आणि मनावर आजही त्या युद्धाचे व्रण कोट्यवधींच्या वित्तहानीतून अजूनही सावरणे सुरूच रसायनास्त्रांमुळे लाखो एकर जमीन नासाडलेली त्यावर पोसलेल्या दोन पिढ्यांमध्ये आजही अनेक कर्करुग्ण आणि व्यंग्यधारी इतके असूनही एखादा देश त्या गडदपर्वाच्या अंताचे स्मरण विजयोत्सवाने साजरे कसे करू शकतो, हा प्रश्न व्हिएतनामबाहेरच्या कुणाला पडेल. पण परवाच्या बुधवारी– ३० एप्रिल रोजी– व्हिएतनामची राजधानी हो चि मिन्ह सिटी (पूर्वीचे सायगाव) येथे जंगी संचलने झाली. तीत व्हिएतनामी फौजांच्या बरोबरीने चिनी तुकड्यांनीही भाग घेतला. अर्धशतकापूर्वी म्हणजे ३० एप्रिल १९७५ रोजी तत्कालीन सायगावमधून अमेरिकी सैनिकांच्या शेवटच्या तुकडीने मायदेशी उड्डाण केले होते. व्हिएतनाम युद्धाने त्याच नावाच्या देशाला ठळक अस्तित्व प्रदान केले. हे युद्ध अमेरिकेच्या इतिहासावरचा मोठाच डाग, कारण २० वर्षे झुंजूनही ५८ हजार सैनिक–निमसैनिक गमावण्याची मानहानी इतर कोणत्या युद्धात अमेरिकेने अनुभवलेली नाही. पण इतिहास किंवा आकडेवारीपलीकडे व्हिएतनाम युद्धाच्या परिणामांचा विचार करावा लागेल. तो परिणाम अमेरिकेच्या जनमानसावर झाला. त्या देशातील नागरिकांचा युद्धाकडे, सरकारकडे, माध्यमांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच कायमस्वरूपी बदलला.

आजच्या काळात कथानक किंवा नॅरेटिव्ह हा शब्द परवलीचा आहे. असे नॅरेटिव्ह दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभी नाझी जर्मनीच्या गोबेल्सने वापरले आणि जनमानसाचा लोंढा पाहिजे तसा आणि तिथे वळवला. नॅरेटिव्हचा त्याच प्रकारे पण वेगळ्या रूपात स्वहितसंवर्धनासाठी वापर व्हिएतनाम युद्धात केला गेला. त्या वेळचे सरकार युद्धाबद्दल काहीही सांगायचे, तेच माध्यमे जनतेपर्यंत पोहोचवायची आणि जनता ते खरे मानून घ्यायची. या भाबड्या फुग्याला पहिली टाचणी १९६०च्या दशकात लागली आणि युद्धाची धग व्हिएतनाम किंवा आग्नेय आशियाच नव्हे, तर अमेरिकेलाही कवटाळू लागली. त्यातून शहाणे होऊन सावरण्यापूर्वी किमान ५८ हजार अमेरिकनांना प्राणाहुती द्यावी लागली. तब्बल चार वेगवेगळ्या अध्यक्षांनी व्हिएतनाम युद्धाच्या काळात अमेरिकेचे धोरण ठरवले होते. ड्वाइट आयसेनहॉवर, जॉन एफ. केनेडी, लिंडन जॉन्सन आणि रिचर्ड निक्सन. या कोणालाही विजयाची खात्री नव्हती. पण कम्युनिस्टांना बडवण्याची संधी सोडून माघार घेणे प्रत्येक अध्यक्षासाठी राजकीयदृष्ट्या अप्रतिष्ठेचे आणि जोखमीचे ठरणार होते. निर्णयक्षमतेबाबत कधी गोंधळ आणि कधी खोटेपणा यांचा आधार अमेरिकी नेतृत्वाने घेतला याचे कारण शत्रू नेमका कोण याविषयी संदिग्धता होती. व्हिएतनामच्या उत्तर भागाचे नेते हो चि मिन्ह आणि त्यांची व्हिएतकाँग ही बंडखोर संघटना हे लक्ष्य असावे, तर इतक्या फुटकळ शत्रूसाठी अर्धी पृथ्वी ओलांडून प्रथम सल्लागार आणि नंतर सैनिक पाठवण्याची गरज नव्हती. पण फ्रेंच इंडोचायना म्हणजे व्हिएतनाम, कम्बोडिया, लाओस तसेच तत्कालीन बर्मा अर्थात म्यानमार या विशाल टापूमध्ये सोव्हिएत रशिया आणि चीन यांच्या साम्यवादी हस्तकांनी हातपाय पसरणे आरंभले होते.

मुळात इंडोचायना ही फ्रेंच वसाहत. दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीने फ्रान्सचा पाडाव केला, ती संधी साधून जपानने इंडोचायनातूनही फ्रेंचांना हुसकावून लावले. परंतु जर्मनी आणि पाठोपाठ जपानचाही पाडाव झाल्यानंतर फ्रान्ससारख्या वसाहतवादी देशाने पुन्हा इंडोचायनावर हक्क सांगणे अन्याय्य होते. पण तसे त्यांनी केले आणि त्यांस अमेरिकेचे समर्थन मिळाले. यातूनच व्हिएतनाम युद्धाची बीजे पेरली गेली. हो चि मिन्ह यांच्या लोकप्रियतेच्या आसपासही अमेरिका आणि फ्रान्सच्या हातचे बाहुले ठरलेले न्गो दीन दिएम हे पोहोचू शकत नव्हते. पहिल्या इंडोचायना युद्धसमाप्तीनंतर व्हिएतनामचे उत्तर आणि दक्षिण भागांमध्ये विभाजन झाले. तेव्हाच्या तहानुसार निवडणूक घेऊन दोन्ही देशांचे एकत्रीकरण अपेक्षित होते. पण पराभवाच्या भीतीने न्गो दीन दिएम यांनी निवडणूक घेतलीच नाही. त्यांनी अमेरिकेच्या मदतीने हो चि मिन्ह यांचा प्रतिकार करण्याचे पाऊल उचलले. तत्कालीन सोव्हिएत रशिया आणि चीनने हो चि मिन्ह यांना पैसा आणि सामग्री पुरवली. मात्र थेट युद्धात सहभागी होण्याची चूक टाळली. अमेरिकेने सुरुवातीस वित्तपुरवठा, सामग्री आणि सल्लागार धाडण्याचा निर्णय घेतला. पण युद्ध पुढे सरकू लागले, तसे म्हणजे १९६०च्या मध्यावर सैनिक धाडण्याचा निर्णय घेतला. या आत्मघातकी निर्णयापर्यंत अमेरिका कशी पोहोचली?

अमेरिकेने १९५०च्या मध्यावर व्हिएतनाममध्ये सक्रिय लक्ष घालण्यास सुरुवात केली, तो काळ अमेरिकनांच्या दृष्टीने वेगळ्याच आत्मविश्वासाचा होता. महायुद्धात मोठ्या भावाची भूमिका घेऊन मिळवलेले विजय, तुलनेने कमी मनुष्यहानी, दुसऱ्या महायुद्धाच्या निमित्ताने लष्करी उद्याोग उभारणीतून मिळालेले यश, अण्वस्त्रनिर्मितीत इतर देशांच्या तुलनेत घेतलेली आघाडी आणि कोणत्याही परिस्थितीत आपण अजेय आणि मूल्यरक्षकच असल्याचा समज अमेरिकेच्या निर्णयामागे होता. प्रेसिडेंट आयसेनहॉवर हे स्वत: यशस्वी लष्करी जनरल. शिवाय जगाला आता साम्यवादाचा धोका असून, नाझीवादाप्रमाणेच साम्यवाद संपवण्याची किंवा किमान रोखण्याची जबाबदारी अमेरिकाप्रणीत युरोपीय देशांचीच आहे असा समज तेथे पद्धतशीरपणे करून दिला गेला. पण व्हिएतनामी राष्ट्र आकांक्षा, गनिमी युद्धतंत्र, सोव्हिएत रशियाकडून व्हिएतकाँगला मिळालेली मदत या घटकांकडे अमेरिकी शासकांचे पूर्ण दुर्लक्ष झाले.

# महाराष्ट्र दिनानिमित्त महिलांचा सत्कार

## धोरण:साबला ग्रामपंचायतचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त प्रथम राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे तसेच ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , चेरमन उत्तमराव काकडे , मुख्याध्यापक धनराज धाट – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , साबला . अध्यक्ष शंकर नाईकनवरे – शालेय व्यवस्थापन समिती , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , साबला . सहशिक्षिका श्रीमती वंदना फाटे , अंगणवाडी शिक्षिका सुनंदा काकडे , अंगणवाडी मदतनिस श्रीमती काशिबाई राऊत साबला , आरोग्य सेविका श्रीमती वर्षा काकडे , नवनिर्वाचित अंगणवाडी मदतनिस श्रीमती शोभा मुळे , ग्रामपंचायात कर्मचारी गुलाब मुळे , विश्वनाथ नाईकनवरे यांच्या हस्ते राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजारोहन उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले .



महिलांना महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग , महाराष्ट्र राज्य . यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन – २०२४ / २५ हा पुरस्कार ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सामाजिक , राजकिय , धार्मिक , शैक्षणिक , सांस्कृतिक क्षेत्रात उत्लेखनिय काम करणाऱ्या महिलांना ट्रॉफी , प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले . त्यामध्ये श्रीमती आश्रुबाई श्रीमंत काकडे , श्रीमती पारुबाई श्रीमंत नाईकनवरे या महिलांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे . श्रीमती आश्रुबाई श्रीमंत काकडे – यांच्या बाबतीत थोडक्यात माहिती अशी आहे . की त्या स्वतः ग्रामपंचायत सदस्य साबला . म्हणून राजकारणात सक्रिय आहेत . तसेच त्यांची दोन्हीही मुलं शिक्षण घेऊन वेगवेळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत . त्यांचे थोरले चिरंजीव हे पुणे येथील पिंपरी चिंचवड येथे स्वतः चा फ्रुटचा व्यवसाय करतात . तर धाकले चिरंजीव हे मुंबई येथे राष्ट्रीय कृत बँकेत नोकरी करतात . त्याचप्रमाणे श्रीमती पारुबाई श्रीमंत नाईकनवरे यांचे पती देखील दोन वेळेस ग्रामपंचायत सदस्य म्हणून तर एक वेळेस सेवा सहकारी सोसायटी संचालक म्हणून त्यांनीही राजकीय क्षेत्रात काम केले आहे . त्यांच्याही मुलांनी शिक्षण घेऊन त्यांचीही दोन्ही मुलं हे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत . त्यामध्ये त्यांचे थोरले चिरंजीव हे शिक्षण क्षेत्रात माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत . ते शिक्षण क्षेत्रात ज्ञानदान करण्याचे काम करतात . तर धाकले चिरंजीव हे पुणे येथील कंपनी मध्ये चांगल्या प्रकारच्या जॉब चे ते काम करतात .

म्हणून या दोन्हीही महिलांची निवड करून त्यांचा सन्मान उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे , समाजसेवक नरहरी काकडे , ग्रामपंचायत अधिकारी तानाजी शिंपले , पोपट काकडे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले , यावेळी राहुल मुळे , श्रीमंत नाईकनवरे , उमाशंकर शिंदे , श्रीमंत काकडे , राजेभाऊ काकडे , जालींदर मुळे , लक्ष्मण काकडे , उद्धव नाईकनवरे , माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे , भारत काकडे , माजी व्हाईस चेरमन आत्माराम काकडे , मेजर अशोक काकडे , चत्रभुज मुळे , रामचंद्र काकडे , सावताराम नाईकनवरे , अंगद काकडे , रामदास मुळे , पवन सरवदे , अंकुश काकडे , रामभाऊ काकडे , अनंत नाईकनवरे , धनेश्वर पांचाळ यावेळी गावातील इत्यादी नागरिक उपस्थित होते .

# चक्रधर माध्यमिक विद्यालयाची राधा राऊत राज्यात सर्वप्रथम

बीड/प्रतिनिधी

श्री. चक्रधर शिक्षण व समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित श्री. चक्रधर माध्यमिक विद्यालय कॅनल रोड , बीड येथील इयत्ता नववीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली कुमारी राधा बंडू राऊत महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत युनिफाईट या खेळात १७ वर्षा खालील मुली मधून राज्यात सर्वप्रथम आलेली आहे.



महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी १४,१७, १९ वर्षे वयोगटातील मुला मुलींच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते.सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये बीड जिल्हास्तरीय युनिफाईड क्रीडा प्रकारात श्री.चक्रधर विद्यालयाची राधा बंडू राऊत ही सर्वप्रथम आली व तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. विभागीय युनिफाईट १७ वर्षाखालील मुलींच्या क्रीडा स्पर्धा फेब्रुवारी २०२५ मध्ये छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाली व या स्पर्धेत ती सर्वप्रथम येऊन राज्य स्पर्धेसाठी पात्र ठरली.

युनिफाईट १७ वर्षाखालील मुलींच्या राज्यस्तरीय स्पर्धा सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते येथे संपन्न झाल्या व या स्पर्धेत देखील तिने सुवर्णपदक जिंकून महाराष्ट्रात चक्रधर माध्यमिक विद्यालयाचा व बीड जिल्ह्याचा दबदबा कायम ठेवत सुवर्णपदकाला गवसणी घातली.राधाच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक मोहनराव शिरसाठ विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक शिरसाठ व विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

राधाला तिचे क्रीडा शिक्षक श्री. नागरगोजे बालासाहेब यांनी वारंवार मार्गदर्शन केले व त्याचा फायदा तिला झाला .आपल्या यशाचे श्रेय तिने तिची शाळा शाळेतील शिक्षक तिचे प्रशिक्षक व आपल्या आई–वडिलांना दिले आहे.

## पान एक वरून

**इंजिनिअर कांदेबाईला राजकीय वरदहस्त**

यांचे भान राहीलेले दिसत नाही कारण कार्यालयाचे नियम काय असतात त्यांना माहीत नाहीत का असा प्रश्न उपस्थित होतो बिडीओ दिवाणे मॅडम तुम्ही फक्त घरकुल लाभार्थी यादी आणि कांदे मॅडमचे फोन पे व गुगलपे चक्क करा सगळेच समोर येईल आणि सर्व सामान्य लोकांची कामे होतील नाही तर केज पंचायत समिती ही कांदे मॅडमचे फोन पे व गुगलपे चक्क करा सगळेच समोर येईल आणि सर्व सामान्य लोकांची कामे होतील नाही तर केज पंचायत समिती ही भ्रष्टाचाराचे कुरण होईल त्यामुळे बिडीओ दिवाने यांनी कांदे वर योग्य कारवाई करणे गरजेचे आहे.

**आडसकर तुम्ही समाजाचा विश्वास**

पवार गटात प्रवेश करुन अनेक नागरिकांचे मन दुखावले आहे असे चर्चा सत्र सुरू झाले आहे कारण आडसकर यांनी लोकांचे खुन करुन स्वःताच्या पोटाची खळगी भरण्यासाठी काम करणाऱ्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री अजित पवार यांच्या गटात प्रवेश करणे योग्य नव्हते असे सुध्दा नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

**बुद्ध धम्माची चळवळ गतिमान**

संकल्प केला होता. आगामी काळात बुद्ध धम्माचा प्रसार करून धम्म चक्र गतिमान करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, सुभाष तांगडे, शाम वीर, विशाल इंगोले, संदिप इंगोले विकास कोरडे, गौतम कोरडे, प्रमोद वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे,बिभीषण जावळे,रामेश्वर खळगे, भाऊसाहेब कांबळे, देवानंद वाघमारे, अविनाश वाघमारे, नामदेव वाघमारे, महादेव ईनकर, अनंत विद्यागर यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

**सदभावनेची मशाल तेवत**

शेकडो नागरिकांची उपस्थिती होती. समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले विचार मांडले. त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये जो काही सामाजिक आणि जातीय सलोखा बिघडलेला आहे त्यावर एकमेव उपाय म्हणजे प्रत्येकाच्या मनामध्ये सद्भावना वाढली पाहिजे सद्भावनेच्या दुधामध्ये जणूकाही बीडने मिठाचा खडा टाकावा अशी सध्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. प्रत्येक नागरिकाला शांतता हवी आहे मात्र बीड जिल्ह्यामध्ये अतिशय विदारक चित्र निर्माण झाले असून यावर कुणीतरी पुढाकार घेणे गरजेचे होते. आणि म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने सद्भावना वाढीसाठी सद्भावना अभियान सुरू केलेले आहे. सद्भावना सत्याग्रहामध्ये जे नागरिक सहभागी झाले ते अतिशय उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले आहेत. आणि सत्याग्रहाचे आयोजनही बीड जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी तसेच परळी शहरातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी अतिशय उत्कृष्ट केले असेही ते म्हणाले. आपल्या विस्तृत भाषणामध्ये अनेक मुद्द्यांना स्पर्श करत हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित नागरिकांना मौलिक विचार दिले. आणि प्रत्येकानी सद्भावना वाढीस लागावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही मत व्यक्त केले. सदरील काँग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी, माजी आमदार मोहन जोशी, बीड जिल्हा प्रभारी अमर खानापुरे, युवानेते आदित्य पाटील, नवनाथ थोटे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील, प्रविकुमार शेप, पशुपतीनाथ दांगट, बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत तसेच तुकडोजी महाराजांच्या संगीतमय विचाराने करण्यात आली.

**मागच्या दराने सर्रास दारु**

आहे मग कार्यवाही काय शोभेला केली होती का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे मसोर दाखवायला बंद परंतु मागच्या दरवाजाने बेसुमार अवैध दारू केली जात आहे कार्यवाही केलेले नाही केलेले सगळे जोमात आहेत कारण बीड जिल्ह्याला पोलिस अधीक्षक कॉवत साहेब व अंबाजोगाई येथील अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम यांनी स्वता कार्यवाही करावी कारण स्थानिक पोलीस प्रशासन कार्यवाही करते का पाठबळ देते नेमके काय करते यांचा ताळमेळ लागेना झाला आहे कारण कार्यवाही केलेले धाब्यावाले कार्यवाही झाली की दोन चार दिवसात लगेच जामिनावर सुटका करून घेतात नंतर जैसे थे परिस्थिती निर्माण होते त्यामुळे जर चिंचोली माळी मध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्यावर वरीष्ठ अधिकारी जिल्हा पोलिस अधीक्षक कॉवत साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम अंबाजोगाई तसेच पोलिस निरीक्षक पाटील साहेब यांनी स्वाता कार्यवाही करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## पान सहा वरून

**आदित्य पॉलिटेक्निकमुळे**

राज्यातील सर्वात मोठ्या एसटीपीपैकी एक आहे. हे भारत सरकारच्या लघु आणि मध्यम शहरांसाठी शहरी पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत (णखउङ्ङ्‌चढ) बांधण्यात आले आहे. सध्या, सांडपाणी निर्मिती सुमारे १०७ एमएलडी आहे. पंपिंग स्टेशनमधील कच्चे सांडपाणी इनलेट चेंबरमध्ये आणले जाते.नंतर ते मोठे घन पदार्थ काढून टाकण्यासाठी यांत्रिक स्क्रीनमधून जाते. स्क्रीनिंगनंतर, सांडपाणी ग्रिट रिमूव्हल चेंबरमध्ये वाहते. प्राथमिक प्रक्रिया (स्क्रीनिंग आणि ग्रिट रिमूव्हल) केल्यानंतर, गुरुत्वाकर्षणाद्वारे सांडपाणी एसबीआर बेसिनमध्ये निर्देशित केले जाते. एसबीआर बेसिनमध्ये एअर ब्लोअर, डिफ्यूझर्स, रिटर्न क्टिव्हेटेड स्लज (आरएएस) पंप, सरप्लस क्टिव्हेटेड स्लज (एसएएस) पंप, डिकेंटर, ऑटो १ व्हॉल्व्ह आणि प्रक्रिया चक्रांच्या स्वयंचलित नियंत्रणासाठी प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी) सुसज्ज आहेत. या औद्योगिक भेटी करिता ४० विद्यार्थी आणि ४ प्राध्यापक सहभागी झाले होते.

**आगे परिवाराचे दुःख हे माझेही**

दौर्यावर आल्या होत्या, त्यावेळी त्यांनी या परिवाराचे दूरध्वनीवरून सांत्वन केले होते व पुढील दौऱ्यात येऊ असे सांगितले होते. त्यानुसार आज त्यांनी किट्टी आडगाव येथे जाऊन आगे यांच्या आई, पत्नी व त्यांच्या चिमुकलीची भेट घेतली व सांत्वन केले.

**कन्हेरवाडी झेडपी शाळेला**

यावेळी विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करुन गुणपत्रिका वाटप करण्यात आले व पुढील वाटचालीस विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या तर सुत्रसंचालन सहशिक्षक दिपक चाळक यांनी केले तर आभार नारायण झोरी यांनी मानले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बि.एन.भंडारे, सहशिक्षक दिपक चाळक, परमेश्वर वाघमोडे, नारायण झोरी,राजेश काळे, विरभद्र काटकर,श्रीमती.मंगल गाढवे,आशा कंगळे,सुषमा हंडिबाग आणि शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

**शॉर्टसर्किटमुळे शेतीचे मोठे**

मिळून हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. ग्रामस्थांनी शेजाऱ्यांच्या मदतीने पाण्याच्या मोटारी व पाइपच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीचे प्रमाण जास्त असल्याने नुकसान टळले नाही. विशेष म्हणजे, स्थानिक नगरपंचायतीची अग्निशमन सेवा वेळेवर पोहोचू शकली नाही, यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला.नगरसेवक आसाराम ( बाबुराव ) जाधव यांनी महावितरणच्या गलथान कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

**लोणार सरोवर**

काळा कस्तूर किंवा ज्याला कस्तुरी, गायकवाड, सालई, सफेद साळुंखी, सालभोरडा किंवा साळोखी अशा अनेक नावांनी ओळखतात.

हा पक्षी मध्यम आकाराच्या मैनेएवढा असतो. याची चोच पिवळी असून रंग संपूर्ण काळा असतो. मादीचा कंठ काळ्या रेषा असलेला पिवळट तपकिरी वर्णाचा असतो आणि चोच काळी असते.हा पक्षी फक्त भारत आणि श्रीलंकेत आढळतो व कमी अंतरावर स्थलांतर करतो. जून ते ऑगस्ट हा त्यांच्या विणीचा काळ असतो. हे पक्षी पानगळीची जंगले व सदाहरितपर्णी वनांमध्ये राहतात. यांची एक प्रजात पश्चिम घाटामध्ये २००० मी उंचीपर्यंत वास्तव्य करते.‘काळा कस्तुर’ हा पक्षी बुलढाणा जिल्ह्यात आढळून आल्याने पक्षी मित्रांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**मटका बुक्यां चालवणारा**

नेमका कोण असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण त्यांच्या वर पोलीस प्रशासन कार्यवाही का करत नाही पोलीस प्रशासन काय गणेश खराडे नावाच्या व्यक्ती समोर हतबल झाले आहे का राजरोस पने केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये एजन्ट नेमून मटका बुक्यां चालवणारा खराडेवर पोलीस प्रशासन एवढे मेहेरबान का आहे तसेच गणेश खराडेवर कार्यवाही केली का जात नाही तर नागरिकांन कडुन बोलले जाते की त्यांचे हप्ते पोलिस प्रशासनाला मिळतात पोलीस प्रशासन काही करु शकत नाही त्यांला असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू असते तरी पोलिस प्रशासन गणेश खराडे नावाच्या मटका बुकी चालकावर पोलिस प्रशासन शोध घेऊन कार्यवाही कधी करणार आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मुरबाडमध्ये प्रथमच पालकांसाठी सुट्टीचा गृहपाठ

## जि. प. भुवन शाळेच्या अनोख्या उपक्रमाची चर्चा !

◆ मुरबाड (वार्ताहर) :

मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात तसेच मुरबाड शहर परिसरात १ मे २०२५ सर्व शाळांचा वार्षिक निकाल जाहीर झाला आणि शाळांना उन्हाळी सुट्टी लागली. मात्र तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा भुवनच्या शिक्षकांनी मुलांच्या पालकांनाच उन्हाळी सुट्टीचा अभ्यास म्हणून गृहपाठ दिला आहे. या गृहपाठात शाळेतील शिक्षकांनी पालकांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, दहा महिन्यांपासून तुमच्या मुलांची काळजी घेण्यात आम्हाला आनंद झाला. पुढील दोन महिने तुमच्या सोबत घालवले जातील, एक शिक्षक म्हणून आम्ही काही गोष्टी सांगत आहोत त्या पालकांनी त्यांच्या मुलांसोबत करण्याचे आवाहन केले आहे. पालकांसाठी सुट्टीचा गृहपाठ या उपक्रमात त्यांच्यासाठी उपयुक्त आणि आनंदी ठरतील अशा काही गोष्टी पालकांनी मुलांसोबत, मुलांसाठी कराव्यात असे सुचवले आहे.



यामध्ये पालकांनी खालील गृहपाठ करायचा आहे. १. मुलांसोबत दोन वेळा जेवण करा. त्यांना शेतकऱ्यांच्या मेहनतीबद्दल सांगा. २. जेवल्यानंतर त्यांना स्वतःची ताटे धुवू द्या. ३. त्यांना स्वयंपाक करण्यास मदत करू द्या. ४. मुलांशी जास्तीतजास्त बोला ५. मुलांना आजी-आजोबांच्या सोबत ठेवा, त्यांना मुलांमध्ये मिसळू द्या. त्यांच्यासोबत वेळ घालवा. ६. फिरायला गेल्यास किंवा कार्यक्रमाप्रसंगी मुलांसोबत फोटो काढा. ७. त्यांना तुमच्या कामाच्या ठिकाणी घेऊन जा जेणेकरून तुम्ही कुटंबासाठी किती मेहनत करता हे त्यांना समजेल. ८. त्यांच्यासोबत स्थानिक सण साजरे करा. ९. बाग, फुलझाडे कुंड्या तयार करण्यासाठी मदत घ्या. तुमच्या मुलांना बिया पेरण्यास, झाडे लावण्यास प्रवृत्त करा. १०. मुलांना तुमचे बालपण आणि कौटुंबिक इतिहास सांगा. ११. तुमच्या मुलांना बाहेर जाऊन खेळू द्या, त्यांना दुखापत होईल याची भीती घालू नका.

अधूनमधून पडणे आणि वेदना सहन करणे भविष्यातील आव्हाने स्वीकारण्यासाठी चांगले आहे. १२. सुट्टीत नुसते लोळू देऊ नका. १३. त्यांना कुत्रा, मांजर, पक्षी किंवा मासे असे कोणतेही पाळीव प्राणी पाळू द्या. १४. त्यांना त्यांच्या आवडीची काही गाणी, लोकगीते गायला, नाचायला व वाजवायला शिकवा. १५. तुमच्या मुलांसाठी रंगीबेरंगी चित्रांसह काही कथा पुस्तके वाचनासाठी आणू द्या. १६. तुमच्या मुलांना टीव्ही, मोबाईल फोन, कॉम्प्यूटरपासून दूर ठेवा. त्यांना खेळ खेळू द्या. १७. रांगोळी, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर यासारखे छंद किंवा कला जोपासण्यास मदत करा. १८. पालक म्हणून तुम्ही तुमचा वेळ तुमच्या मुलांना देणे महत्त्वाचे आहे.

आज आपली मुले या सर्व गोष्टीपासून दूर आहेत, त्यांना त्या मिळू द्या ज्यामुळे आपण स्वतःही त्यांच्यासोबत आनंदी असू. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा भुवन या शाळेने राबवलेल्या 'पालकांसाठी सुट्टीचा गृहपाठ' या उपक्रमाचे पालकांकडून स्वागत होत असून आम्ही हा गृहपाठ पूर्ण करण्याचा प्रयत्न करू असा विश्वास दिला आहे. या उपक्रमाचे नियोजन केंद्रप्रमुख गुरुनाथ घुडे शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक राजाराम सोंगाळ, बाळकृष्ण इसामे संतोष जामघरे. जयश्री शेलवले व दिलीप खाटेघरे गुरुजी यांनी राबविला आहे. आणि सर्व पालकांनी या गृहपाठाचे चांगले अभिप्राय येतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



## शिवकालीन शस्त्र, नाण्याचे प्रदर्शन

**कळवा :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शिवकालीत शस्त्र, पुरातन नाणी याचे भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांची छायाचित्रे आणि शिवकालीन शस्त्रांची प्रात्यक्षिके ठेवण्यात आली होती. शिवसेना कळवा-खारीगाव महिला सहसंघटक रचना पाटील, शिवसेना कळवा उपशहर प्रमुख राकेश पाटील यांच्या पुढाकाराने पारसिक नगर, खारीगाव येथे सदर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना ज्येष्ठ नेते दशरथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सदर प्रसंगी शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, नगरसेवक उमेश पाटील, पोलीस उपायुक्त उत्तम कोळेकर, कळवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक उतेकर, मनोज पाटील, गजानन पवार यांनीही या कार्यक्रमाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## वेचक

### बांधकाम कामगारांना संरक्षक किट वाटप




**ठाणे :** ठाण्याचे आमदार संजय केळकर यांच्या "जनसेवकाचा जनसंवाद" या उपक्रमाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाअंतर्गत शेकडो नागरिकांनी आ. केळकर यांची खोपट कार्यालयात भेट घेतली. यावेळी विविध तक्रारीची ६८ निवेदने प्राप्त झाली. यामध्ये महापालिका संबंधित विषय, चरई परिसरातील बांगलादेशीय फेरीवाले, टपऱ्या, हातगाड्या, पाणी विषय, रेशनिंग कार्यालयाबाबत, अनधिकृत बांधकामे, हॉस्पिटल विषय, फसवणूक, ठामपा आरोग्य विभागातील कर्मचारी पगार, कर विषय अशा विविध विषयांतील निवेदने आ. केळकर यांना देण्यात आली. यावेळी आ. केळकर संस्थापक असलेल्या अटल बांधकाम व घरेलू संघटना महाराष्ट्र राज्य, या संघटनेच्या माध्यमातून व सचिन शिनगारे यांच्या प्रयत्नाने बांधकामाचे काम करणाऱ्या कामगारांना घरगुती भांडी व संरक्षक किट वाटप करण्यात आले.

### धसई केंद्राला गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान



**मुरबाड :** नॅशनल ॲवार्ड ते जिल्हाभरीत ९४% इतके उत्तम सेवेचे प्रमाणपत्र लाभलेल्या मुरबाड तालुक्यातील धसई आरोग्य केंद्राला १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर बनसोडे प्राथमिक आरोग्य धसई वैद्यकीय अधिकारी नंदकुमार गोरडे व कर्मचारी वर्गाला उत्कृष्ट काम करून राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता आश्वासन मानके प्रमाणपत्र मिळविल्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे कोरोना महामारीत तालुका आरोग्यअधिकार व संपूर्ण आरोग्य विभागाने विविध उपक्रम राबवून कोरोनावर मात करण्यासाठी योगदान दिले होते.

### महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

**कल्याण :** 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' यांचा जयंती दिन तसेच वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया) तिथीनुसार 'महात्मा बसवेश्वर' यांचा जयंती दिन महापालिकेत संपन्न झाला. महापालिका मुख्यालयात



त्यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त अभिनव गोयल आणि अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या समयी उपायुक्त संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता योगेश गोटेकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले.



कापूरबावडी या ठिकाणी मेट्रोचे काम सुरू असतानाच क्रेनचा भाग कोसळला. यात कारचे नुकसान झाले, मात्र रमेश म्हात्रेंचे कुटुंब वाचले. ते घोडबंदरवरून भाईंदरच्या दिशेने जात होते. (छाया : अशोक घाग)

## पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या आवाहनानुसार उपक्रमास प्रारंभ

# आपलं गाव स्वच्छ ठेवू! अभियानास सुरुवात





◆ ठाणे (प्रतिनिधी):

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ठाणे जिल्ह्यात 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!' या विशेष स्वच्छता अभियानाला १ मे रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश ग्रामस्तरावर सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून गाव स्वच्छ ठेवण्याची सवय निर्माण करणे हा आहे.

'राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत गावांगावांमध्ये स्वच्छतेच्या ज्या सोयी निर्माण करण्यात आलेल्या आहेत, त्याचा ग्रामस्थांनी नियमित वापर करून आपले गाव कायमस्वरुपी स्वच्छ ठेवावे हा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!' हे अभियान १ मेपासून सुरू करण्यात आले असून या अभियानात सर्व लोकप्रतिनिधींसह समस्त ग्रामस्थांनी सहभागी व्हावे व आपले गाव स्वच्छ ठेवावे, असे आवाहन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत गावांमध्ये महिलांना निळ्या व हिरव्या डस्टबिनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर नाडेप पद्धतीने कंपोस्ट खड्डा भरण्याचे उद्घाटनपर कार्यक्रम पार पडले. ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, महिला बचत गट, विस्तार अधिकारी, इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अभियानाचे कालावधी आणि उद्दिष्टे:**

या अभियानाचा कालावधी १ मे ते १५ सप्टेंबर, २०२५ असून, त्यात टप्प्यांत काम केले जाणार आहे. ओल्या कचऱ्याचे संकलन व नाडेप पद्धतीने खत निर्मिती ग्रामपातळीवर स्वच्छतेच्या सवयींचा विकास पर्यावरण रक्षण आणि पुनर्वापराविषयी जागरूकता जनसहभागातून श्रमदान आणि सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होणे हे आहे.

**जिल्हा परिषदेच्या भूमिका आणि आवाहन**

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक प्रमोद काळे यांनी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन केले आहे. जिल्हा परिषदेच्यावतीने सर्व ग्रामस्थांना आवाहन करण्यात येते की त्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून स्वच्छ, आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक ग्रामविकासात योगदान द्यावे.

## शिक्षण माध्यमिक विभागातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर

### पालकांनी शाळेची मान्यता तपासूनच प्रवेश घेण्याचे आवाहन

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागात काही शाळा शासनाची आवश्यक मान्यता न घेता अनधिकृतरीत्या शिक्षण संस्था चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पालकांनी प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची मान्यता व नोंदणी क्रमांक तपासावा, असे आवाहन शिक्षण विभाग (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक अनधिकृत शाळांची यादी

१. आर. एन. इंग्लिश स्कूल, सर्वे क्र.११६/१६,१७ मौजे कोनगाव,

२. इंग्लिश प्रायमरी माध्यमिक उच्च माध्यमिक स्कूल नवी वस्ती टेमघर ता. भिवंडी

३. फकिह इंग्लिश स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज, म्युनिसिपल हाऊस क्र.१००८/०, न्यु गौरीपाडा, भिवंडी, जि.ठाणे

४. एस. एस. इंडिया हायस्कूल दिवा (पूर्व).

५. श्री. विद्या ज्योती स्कूल, डावले, ठाणे

६. केम्ब्रीज इंग्लिश स्कूल, मानसी कॉम्प्लेक्स भोलेनाथ मुंब्रादेवी कॉलनी रोड, मुंब्रा जि.ठाणे

७. एस. एस. इंग्लिश हायस्कूल, ईश्वरपार्क, मुंब्रादेवी मेडीकल जवळ, मुंब्रादेवी रोड, दिवा (पूर्व)

८. ओमसाई इंग्लिश स्कुल, दातिवली रोड दिवा जि.ठाणे

९.पी.टी.आर.एस.डी.इंग्लिश स्कूल सर्व्हे नं. ५६ बल्याणी टिटवाळा

१०. चेतना हिंदी विद्यामंदिर, कल्याण (पू.), चक्की नाका, हाजी मलंग रोड, कल्याण (पू.), जि. ठाणे

११. ओम साई इंग्लिश स्कूल पिसवली.

१२. रेनबो इंटरनॅशनल स्कूल, कॉसमॉस आर्केड, फेज-४, टीएमसी वॉटरटँकजवळ, ब्रम्हानंद, ठाणे

१३. शारदा इंग्रजी माध्यमिक शाळा.

१४. डी. आर. पाटील इंग्लिश मेडियम स्कूल तुर्भे नवी मुंबई

१५. अल मुनीहाज सेकंडरी हायस्कूल, बेलापूर, नवी मुंबई

१६. ओईएस इंटरनॅशनल स्कूल सेक्टर १२ वाशी नवी मुंबई

या शाळांकडे माध्यमिक शिक्षणासाठी आवश्यक शासकीय मान्यता उपलब्ध नाही. त्यामुळे या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे अनुचित असून, भविष्यातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालकांनी सजग राहावे. शासनमान्य शाळांची यादी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. पालकांनी कोणत्याही प्रवेशापूर्वी अधिकृत शाळांची माहिती तपासून निर्णय घ्यावा, असे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे.

## शहिदांना श्रद्धांजली

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील टिळक चौक शिवसेना शाखेच्या वतीने गुरुवारी पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात शहीद घटना प्रकरणी पाकिस्तानचा निषेध करण्यात आला. तर या हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली देखील वाहण्यात आली.

पहेलगाम येथील गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या मोने, लेले, जोशी यांचे नातेवाईक कल्याणात असून त्यांच्या दहावाच्या विधीला त्यांना शिवसेना कार्यालय, येथे हा त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## जिल्हा परिषद केंद्र शाळेत विकासकामांचे लोकार्पण

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्र शाळा संगम येथे मिलान लॅबोरेटरी व रोटरी क्लब ठाणे नॉर्थ यांच्या विशेष सहकार्याने शाळेतील इमारतीचे रंगकाम, शेड, नवीन किचन शेड, तसेच इतर भौतिक सुविधा मोफत देण्यात आल्याने या विकासकामांचा लोकार्पण सोहळा मिलान लॅबोरेटरी लि. चे सर्वेसर्वा स्व. उपेंद्र देशपांडे



यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून मिलान लॅबोरेटरीच्या अध्यक्षा शर्वरी देशपांडे, किर्ती चौधरी व रोटरी क्लब ठाणे नॉर्थच्या अध्यक्षा मेघा जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे सुनील सोमन रोटरी क्लबचे अमोल नाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका मेघा देशमुख, वरिष्ठ शिक्षक तानाजी माळी, सहशिक्षक महेश शिंदे केंद्र प्रतिनिधी इसामे, पाटील शिक्षक उपस्थित होते.

## जातनिहाय जनगणना निर्णयाचा भाजपाकडून जल्लोष

◆ ठाणे (प्रतिनिधी):


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल भाजपातर्फे ठाणे शहरात जल्लोष व्यक्त करण्यात आला. भाजपाचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी कार्यकर्त्यांसह रेल्वे स्टेशनबाहेर जल्लोष करून नागरिकांना लाडू वाटप करीत आनंद व्यक्त केला. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी घोषणा देत व नृत्य करीत आनंद व्यक्त केला.



या वेळी माजी उपमहापौर सुभाष काळे, मुकेश मोकाशी, माजी ज्येष्ठ नगरसेवक भरत चव्हाण जिल्हा सरचिटणीस मनोहर सुगदरे, यांच्यासह पदाधिकारी मंडल अध्यक्ष, विविध प्रकोष्ट प्रमुख यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात

**भाईंदर :** महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा व कामगारांच्या अतुलनीय योगदानाचा गौरव करणारा महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपस्थितीत अत्यंत सन्मानपूर्वक आणि उत्साहात




साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी घोडबंदर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ स्मारक, एमटीएनएल, भाईंदर (प.) समोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मारक आणि महापालिका मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. आंबेडकर आणि यांच्या अर्धाकृती पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या मानवंदनेत महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

## डोंबिवली रेल्वे स्थानकातील रखडलेल्या सरकत्या जिन्याच्या कामाला प्रारंभ

◆ डोंबिवली (प्रतिनिधी):

डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्र .३ आणि ४ वरील रखडलेल्या सरकत्या जिन्याच्या कामाला रेल्वे प्रशासनाने सुरूवात केली आहे. मागील सहा महिन्यांपासून हे काम रखडल्याने फलाटावरील प्रवाशांना वळसा घेऊन जिन्यावर जावे लागत होते. तसेच या कामामुळे फलाटाचा भाग अरूंद झाला होता.



फलाटावर वावर करणे प्रवाशांना मुश्किल झाले होते. डोंबिवली रेल्वे स्थानक मध्य रेल्वे स्थानकावरील सर्वाधिक गर्दीचे स्थानक म्हणून ओळखले जाते. या रेल्वे स्थानकातील वाढत्या गर्दीचा विचार करून रेल्वे प्रशासनाने फलाट क्रमांक १ ते ५ क्रमांकाला जोडणारा पादचारी पूल फलाटाच्या मध्यभागी सुरू केला. या सुविधा सुरू असताना डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्र. ३ आणि ४ वर कल्याण बाजूकडे मागील सहा महिन्यापूर्वी रेल्वे प्रशासनाने या भागात प्रवाशांना उतरण्यासाठी असलेला जिना तोडून टाकला. त्या जागी सरकत्या जिन्याच्या कामासाठी खड्डा आणि फलाटावर त्या कामाच्या ठिकाणी चारही बाजुने संरक्षित पत्रे लावले होते. हे काम लवकरच पूर्ण होईल अशी रेल्वे प्रवाशांना अपेक्षा होती. फलाट क्रमांक ३ आणि ४ वर कल्याण दिशेने उतरण्यासाठी जिना नसल्याने प्रवाशांना दक्षिण बाजूच्या जिन्याने जाऊन पुन्हा माघारी येऊन फलाटावर कल्याण दिशेकडे जावे लागत होते.

हा वळसा घेताना प्रवाशांची दमछाक होत होती. फलाट क्र.३ आणि ४ वर मुंबईला जाणाऱ्या आणि कर्जत, कसारा, अंबरनाथ, खोपोलीकडे जाणाऱ्या जलद लोकल धावतात. या दोन्ही बाजूकडील लोकल एकावेळी फलाटावर आल्या की कल्याण बाजूकडील भागात गर्दी होत होती. प्रवाशांमध्ये रेटारेटी होत होती.कल्याण दिशेने उतरलेला प्रवासी फलाटावर दक्षिण दिशेने चालत जाऊन तेथून जिन्यावर जात होता.

## कैद्यांच्या अधिकारांचे कारागृहात लावले फलक

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

कारागृहातील न्यायाधीन बंद्यांना त्यांचे अधिकार समजावेत, त्या अधिकारांचा त्यांना उपयोग करून घेता यावा, यासाठी ठाणे मध्यवर्ती आणि कल्याण कारागृहात अधिकार जागृती फलक लावण्यात आले आहे. ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या आदेशानंतर हे फलक लावण्यात आल्याचे ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण प्रशासनाकडून सांगण्यात आले. या कारागृहामध्ये सध्या क्षमतेपेक्षा अधिक बंदी आहेत. त्यामध्ये जामीन मिळालेला असतानाही काही किरकोळ नियमांची पूर्तता झाली नसल्याने हे बंदी आहेत. त्यामुळे कारागृह प्रशासनावरील ताण वाढला असून, सुरक्षेच्या दृष्टीनेही हे कठीण आहे. कारागृहात ४,००० हून अधिक बंदी आहेत. या कारागृहाची क्षमता अवघी १,१०० एवढी आहे, तर कल्याण जिल्हा कारागृहाची बंदी क्षमता ५४० असताना २,००० हून अधिक बंदी येथे आहेत. त्यामुळे न्यायाधीन बंद्यांची वाढती संख्या पाहता ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने त्यांच्या अधिकारांची जाणीव व्हावी, यासाठी कारागृहांमध्ये अधिकार फलकांबाबतीत जनजागृती करण्यात येत आहे. कारागृहामध्ये वावर असलेल्या जागांचा शोध घेत त्या ठिकाणी असे फलक लावण्यात आल्याचे सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, न्यायाधीश, ईश्वर सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

### ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीनंतर महापालिकेची कारवाई

## महात्मा फुले मंडईमधील सात मसाला गिरण्या सील

◆ ठाणे (प्रतिनिधी):

महात्मा फुले मंडईतील मसाला मार्केटमधील सात मसाला गिरण्या ठाणे महापालिकेने सील केल्या आहेत. या गिरण्यांमध्ये असलेल्या मोठ्या यंत्रांमुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक व मंडईतील सदस्यांनी केली होती.

स्थानिकांनी केलेल्या तक्रारींची दखल घेऊन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महापालिका अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, परिमंडळ उपायुक्त



शंकर पाटोळे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, सहाय्यक आयुक्त (स्थावर विभाग) राजेश सोनावणे, नोपाड्याचे सहाय्यक आयुक्त सोपान भाईक यांनी या मसाला गिरण्यांची पाहणी केली.

या गिरण्यांमध्ये मोठी यंत्रसामग्री असल्याने या गिरण्या मंडईऐवजी औद्योगिक क्षेत्रात असायला हव्यात. या यंत्रांमुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होत होते. सुमारे १०० डेसिबलपर्यंत ध्वनीपातळी येथे नोंदवण्यात आली.

त्यांना मार्च-२०२५मध्ये ध्वनी प्रदूषणाबाबतची नोटीसही बजावण्यात आली होती. तरीही या गिरण्या सुरूच होत्या. त्यामुळे ध्वनी प्रदूषण नियंत्रणाचे पालन करत नसल्याने त्या सील करण्यात आल्याची माहिती उपायुक्त शंकर पाटोळे यांनी दिली.

## खारेगाव खाडी पुलाच्या कामासाठी आज एकेरी वाहतूक

◆ ठाणे (प्रतिनिधी):

मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव पुलावर शनिवारी पहाटे तुळई बसविण्याचे काम केले जाणार आहे. ठाणे वाहतूक पोलीस या कामासाठी खारेगाव पुलावर पहाटे दोन ते चार या दोन तासांच्या कालावधीत एकेरी पद्धती वाहतूक सोडणार आहेत. त्यामुळे पहाटे वाहनांचा भार वाढल्यास कोंडी होण्याची शक्यता आहे. मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव उड्डाणपूलावरून हजारो अवजड, हलकी वाहने वाहतूक करतात. या मार्गावरील वाहनांना वाहतुकीसाठी रस्ता अंत्यत अरुंद आहे. त्यामुळे या मार्गावर राज्य रस्ते विकास प्राधिकरणाकडून (एमएसआरडीसी) रस्ते



रुंदीकरणाचे काम सुरू आहे. येथील वडपे ते माजिवडा रुंदीकरणाचे काम एमएसआरडीसीकडून केले जात आहे. या रुंदीकरणाच्या कामाचा भाग म्हणून शनिवारी पहाटे या मार्गिकेवर तुळई बसविण्याचे काम केले जाणार आहे. या कामासाठी मार्गिकेवर पहाटे वाहतूक पोलिसांनी बदल लागू केले आहेत.

ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे ६ या कालावधीत प्रवेश मिळत असतो. उर्वरित वेळेत अवजड वाहनांना प्रवेशबंदी असते. त्यामुळे महामार्गावरून मध्यरात्री, पहाटे मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असते. वाहनांचा भार वाढल्यास कोंडी वाढण्याची शक्यता आहे.

मुंबई नाशिक मार्गावरील सर्व वाहनांना खारेगाव पुलाच्या सुरुवातीस प्रवेशबंदी असेल. येथील वाहने उजव्या बाजूस वळण घेऊन नाशिक मुंबई वाहिनीवरून एकेरी पद्धतीने वाहतूक करतील. खारेगाव पूल संपल्यानंतर बाँबे ढाबा समोरील दुभाजकातील वळण मार्गावर डावे वळण घेऊन पुन्हा मुख्य मार्गाने वाहतूक करू शकतील.

## 'भागशाळा मैदानात शहीद स्मारक उभारा'

**कल्याण :** पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात डोंबिवलीतील अतुल मोने, संजय लेले, हेमंत जोशी या तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या तिघांच्या आठवणीसाठी डोंबिवलीमध्ये स्मृतीस्थळ उभारण्याची मागणी भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून पहलगाममध्ये डोंबिवलीतील एकाच कुटुंबातील हे तिघेजण होते. या परिवाराशी प्रत्येक नागरिकाचे भावनिक बंध जुळले आहेत. म्हणून स्मृतिस्थळ कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने उभारावे ही समस्त डोंबिवलीकरांच्या वतीने मागणी असल्याचेही चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पाकला धडा शिकवणार, कूटनीती की रणनीती

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण गंभीर जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. हा हल्ला पाकिस्तानने त्यांच्या दहशतवाद्यांकडून करवून घेतला, याचे पुरावे भारतीय सुरक्षा यंत्रणांना पहलगाम परिसरामध्ये उपलब्ध झाले. पाकिस्तान या प्रकरणी हात झटकत असला तरी भारतात होत असलेले दहशतवादी हल्ले हे पाकपुरस्कृतच असल्याचे जगजाहीर आहे. पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला झाल्याने जम्मू-काश्मीरच्या पर्यटनांवर परिणाम झाला आहे. नवविवाहित जोडपी हनीमूनसाठी जम्मू-काश्मीरमध्ये आलेली असताना, सुखी संसाराची स्वप्ने रंगवत असतानाच हा दहशतवादी हल्ला झाला आणि अनेकांच्या नवसंसाराची राखरांगोळी झाली. पहलगाममध्ये हल्ला होताच भारताच्या कॅबिनेट सुरक्षा समितीने काही निर्णय घेतले. त्यात १९६०चा सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा करार तत्काळ प्रभावाने स्थगित करण्यात येईल, जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलीकडच्या दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत ही स्थगिती लागू राहील. अटारी बॉर्डर तत्काळ प्रभावाने बंद करण्यात येईल. ज्या नागरिकांनी वैध कागदपत्रांच्या आधारे सीमा ओलांडली आहे त्या पाकिस्तानी नागरिकांना १ मे २०२५ पर्यंत यामार्गाने भारत सोडण्याचे आदेश. पाकिस्तानी नागरिकांना सार्क व्हिसा सूट योजना या योजनेखाली भारतात प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही. याआधी पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले कोणतेही व्हिसा रद्द मानले जातील. सध्या सार्क व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्या कोणत्याही पाकिस्तानी नागरिकाला भारत सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत देण्यात आली. नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण/लष्करी, नौदल आणि हवाई सल्लागारांना 'पर्सना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले. त्यांना भारत सोडण्यासाठी एक आठवड्याची मुदत देण्यात आली. इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून भारताच्या संरक्षण/नौदल/हवाई सल्लागारांना परत बोलावण्यात आले. संबंधित उच्चायोगांमधील ही पदे रद्द मानली जातात. दोन्ही उच्चायोगांमधून सेवा सल्लागारांचे पाच सहाय्यक कर्मचारी देखील काढून घेतले जातील. १ मे २०२५पर्यंत आणखी कपात करून उच्चायुक्तालयात काम करणाऱ्यांची संख्या ५५ वरून ३० पर्यंत कमी केली जाईल. पाकनेही त्यास तत्काळ प्रत्युत्तर देत तशाच स्वरुपाचे निर्णय घेतले. फक्त त्यात भारताशी तसेच भारताच्या माध्यमातून इतर देशांशी होणारा सर्व व्यापार त्वरित स्थगित केले, हा अतिरिक्त निर्णय घेतला. पहलगाम घटनेनंतर दोन्ही देशांवर युद्धाचे सावट आहे. पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह सातत्याने बैठका घेत आहेत. देश स्वातंत्र्य झाल्यापासून पाकिस्तान सातत्याने भारतविरोधी कुरापती करतच आहे. १९४७, १९६५, १९७१ या तीनही युद्धांमध्ये भारताने पाकिस्तानचा दणदणीत पराभव केला आहे. भारताशी उघडपणे युद्ध जिंकणे शक्य नसल्याने दहशतवाद्यांच्या माध्यमातून देशामध्ये गोळीबार, स्फोट, हल्ले घडवून आणणे, कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, भारताच्या चलनात बनावट नोटा घुसविणे अशा प्रकारातून भारताचे नुकसान करण्याचा पाकिस्तानचा उद्योग गेली ६८ वर्षे सातत्याने सुरूच आहे.

२६/११चा सागरी मार्गाने झालेला हल्ला, कारगील युद्ध, आताचा पहलगामचा प्रकार असे हजारोंनी प्रकार पाकिस्तान करत असल्याने पाकिस्तानला कायमचाच धडा शिकविण्याची भाषा आज प्रत्येक भारतीयांकडून उघडपणे बोलली जात आहे. पाकविरोधी कारवाईसाठी सर्व राजकीय नेते व पक्षसंघटना एकवटल्या आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानबाबत निर्णय घेण्याचे व वेळ ठरविण्याचे स्वातंत्र्य भारताच्या तीनही संरक्षण दलाला दिले आहेत. या युद्धातून होणाऱ्या नुकसानीची झळ काही वर्षे दोन्ही देशांना सोसावी लागणार आहे. युद्ध झाले तरी चालेल, पण पाकिस्तानला ठेचलेच पाहिजे, पाकिस्तानच्या कारवायांना ठोस उत्तर दिले पाहिजे, असा सूर भारतीयांकडून आळविला जात असून केंद्र सरकारवर दिवसेंगणिक तसा दबावही वाढत चालला आहे. मुस्लीम राष्ट्रांनी पाकिस्तानला समर्थन द्यावे यासाठी त्यांच्याकडे याचना केली जात आहे. तुरुंगातील कैद्यांकडेही मदत मागण्याची वेळ पाकिस्तानच्या पंतप्रधानांवर आली आहे. भारताकडून संभाव्य हल्ल्याच्या भीतीनेच धीर खचलेल्या पाकिस्तानमध्ये आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताने व पाकिस्तानने एकमेकांना हवाई हद्दीचा वापर करण्यास मनाई केल्याने या अकरा दिवसांमध्ये दोन्ही देशांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे व युद्धसदृश्य वातावरण लांबल्यास अजून मोठ्या प्रमाणावर दोघांचीही प्रचंड आर्थिक हानी होण्याची भीती आहे. भारताच्या कारवाईने घाबरलेल्या पाकिस्तानने पीओकेमधील १ हजारहून अधिक मदरसे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भारत मदरशांना दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे म्हणून लक्ष्य करेल या भीतीने १० दिवसांसाठी मदरसे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षेसाठी नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. भारताने हल्ला केल्यास अन्न, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली आहे, असा दावा पीओके सरकारने केला आहे. आपत्कालीन निधीत एक अब्ज रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे. पाक अधिकाऱ्यांनी नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील इतर संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घातली. अनेक पर्यटकांना मार्बल चेकपोस्टवरून परत पाठवण्यात आले. लिपा व्हॅलीमधील रहिवाशांना नियंत्रण रेषेजवळ जाण्यास मनाई करण्यात आली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांमुळे पाकिस्तान अस्वस्थ झाला आहे. भारत हल्ला करेल याची पाकिस्तानला भीती वाटत आहे. दोन्ही देशांचे सैनिक सज्ज झाले आहेत. दोन्ही देशाचे सत्ताधारी युद्धाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक देशांचा पाठिंबा मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पाकिस्तान आर्थिक समीकरणात कंगाल झालेला असल्याने पाकिस्तानची बाजू घेऊन भारतासारखी बाजारपेठ गमविण्याचा धोका सहजासहजी कोणी स्विकारणार नाही. युद्धसदृश्य परिस्थितीमुळे सीमारेषेवर तणाव वाढला आहे. दोन्ही बाजूच्या कुरुक्षेत्रावर सैन्याची जमवाजमव झाली आहे. हवाई तसेच पाण्यातूनही लढाई लढण्याची चाचपणी सुरु झाली आहे. केवळ युद्धाचा बिगुल वाजण्याचीच दोन्हींकडून प्रतिक्षा सुरु आहे.

# 'गझवा ए हद'ला उत्तर द्यावे



अनिल आठल्ये

निवृत्त कर्नल, अभ्यासक

भारत आपल्या संस्कृतीप्रमाणे युद्धनीती आखतो. आजही आपल्यातील तो भाव जिवंत आहे. मात्र आता उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे असल्याचे ताज्या दहशतवादी हल्ल्याने दाखवून दिले आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे स्पष्ट सांगण्याची वेळ आली आहे. देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजले तर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल.

पाकिस्तानसंदर्भात अगदी १९४७ पासून आपले धोरण चुकीचे राहिले आहे. भारताप्रमाणेच पाकिस्तानलाही आपल्या देशातील लोकांची काळजी आहे आणि आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान समृद्ध व्हावा यासाठी तेथील सरकार आपल्या सरकारप्रमाणेच काम करेल, अशी भाबडी आशा आपण गेली ७५ वर्षे बाळगून आहोत. इतिहासाचा दाखला घेतला, तर १९४७ मध्ये पाकिस्तानमध्ये आर्थिक सुबत्ता होती. तेथील जनतेचे राहणीमान बाकी भारतापेक्षा चांगले होते. तसेच पाकिस्तानी नागरिकांचे दरडोई उत्पन्न भारताच्या दुप्पट होते. पण या ७५ वर्षांनंतर पाकिस्तानी जनता सर्वसामान्य भारतीय नागरिकांपेक्षा गरीब झाली आहे तसेच त्यांचे दरडोई उत्पन्न भारतीयांच्या उत्पन्नाच्या निम्मेदेखील नाही, हे वास्तव आहे.

आज पाकिस्तान भिकेला लागण्याचे मुख्य कारण म्हणजे या देशाचे उद्दिष्ट्य युद्ध आणि काश्मीर काबीज करणे हेच आहे. जनतेच्या आर्थिक विकासाला त्यांनी कधीच प्राथमिकता मानले नाही. उत्तर भारताच्या इतिहासाकडे नजर टाकली, तर दिल्लीचे सुलतान आणि नंतरचे मोघल साम्राज्य यांनीही हेच केल्याचे दिसते. त्याचाच कित्ता पाकिस्तान गिरवत आहे. खेरीज इस्लामी धार्मिक शिकवणीप्रमाणे भारताला 'गझवा ए हद' म्हणजे पादाक्रांत करून त्याचे संपूर्ण इस्लामीकरण करणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे, असेच मानले जाते. काश्मीर हे केवळ निमित्त आहे; परंतु संपूर्ण हिंदुस्तान पादाक्रांत करणे हेच पाकिस्तानचे जन्मापासूनचे उद्दिष्ट्य राहिले आहे. मात्र दुर्दैवाने भारताच्या नेतृत्वाला आजपर्यंत या मूलभूत प्रश्नाची समज आलेली नाही. पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, अटलबिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी आणि अगदी पंतप्रधान मोदी आदींनी कधी ना कधी पाकिस्तानशी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. पण या मूलभूत धार्मिक धोरणेमुळे पाकिस्तान भारताशी कधीच शांतता ठेवणार नाही, हे भारतीयांना आजपावेतो समजलेले नाही.

जनरल मुशर्रफ कारगील युद्धावेळी पाकिस्तानचे हुकूमशहा होते. त्यांनी सत्तेतून पायउतार झाल्यानंतर एकदा म्हटले होते की, काश्मीर प्रश्न पाकिस्तानच्या मनाप्रमाणे सुटला तरी भारत-पाकिस्तानात शांतता नांदणे शक्य नाही. त्यामुळेच भारतीयांची एकूणच युद्ध आणि त्याचा उपयोग याबद्दलची मनोवृत्ती आणि धारणा अजूनही श्रीरामाच्या काळातील सत्ययुगात अडकलेल्या आहेत, असे म्हणावे लागेल. भारतीय इतिहासाकडे डोळसपणे पाहिले तर जाणवते की, परकीय आक्रमणांसमोर आपण कधीच टिकाव धरू शकलो नाही. अर्थातच याला आपापसातली भांडणे आणि राजकीय ऐक्याचा अभाव कारणीभूत आहे; परंतु, त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे अगदी महाभारत काळापासून भारतीय युद्धाकडे 'सीमित युद्ध' अशाच भावनेने पाहतात. दुसरीकडे, परकीय आक्रमक संपूर्ण युद्ध आणि शत्रूचा संपूर्ण विनाश या उद्दिष्टाने लढतात. या मूलभूत फरकामुळे वैयक्तिक शौर्य असूनही धर्मयुद्धाच्या कालबाह्य कल्पनांमुळे भारतीय अनेक लढाया हरत राहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या शतकात या ऐतिहासिक चुकीला तिलांजली देऊन हदवी साम्राज्य स्थापन केले. जवळपास ५०० वर्षांनंतर महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी आक्रमकांवर निर्भेळ विजय मिळवले. राजपूतांचा सर्व भर वैयक्तिक शौर्यावर असे. यापुढचे पाऊल म्हणजे विजय मिळवण्याऐवजी हौतात्म्य पत्करण्याचीच फुशारकी मिरवली जाऊ लागली. आज पाकिस्तानशी सामना करताना पुन्हा एकदा शिवाजी महाराजांनी शिकवलेला धडा गिरवण्याची गरज आहे. आज भारतीयांनी मनाशी खूणगाठ बांधण्याची गरज आहे की, पाकिस्तानचे राष्ट्रीय उद्दिष्ट भारतावर कब्जा करणे आणि संपूर्ण भारत इस्लाममय करणे हेच आहे. पाकिस्तानच्या मते शांतता ही तात्पुरती सोय असते. यामुळे भारताला पाकिस्तानी आव्हानाचा यशस्वी सामना करायचा असेल, तर पाकिस्तान पूर्णपणे नष्ट करणे हे राष्ट्रीय उद्दिष्ट ठेवण्याखेरीज पर्याय नाही. एकदा हे राष्ट्रीय उद्दिष्ट सर्वसंमत झाले की त्यानंतर देशाचे धोरण, रणनीती आणि डावपेच आपोआपच बदलतील.

नेहमीप्रमाणे पहलगामचा हल्ला झाल्यानंतर ही गुप्तहेर तंत्राची चूक होती, अशी आवई उठवली गेली; परंतु गुप्तहेर संस्थांना दोष देणारे लोक विसरतात की, गेल्या ३० वर्षांमध्ये काश्मीरमध्ये पर्यटकांवर कधीच हल्ले झालेले नाहीत. पहलगाममध्ये ज्या प्रकारे एका आडबाजूला अनेक पर्यटक गेले होते तसेच मी स्वतः दोन वर्षांपूर्वी पत्नीसह सोनमर्गजवळ अशाच एका ठिकाणी गेलो होतो. तेथेही जाण्यास घोड्यावरून प्रवास करावा लागला होता आणि आमच्यासारखे असेच शंभरभर पर्यटक तेव्हा तेथे होते. पहलगामप्रमाणेच त्या ठिकाणीदेखील आमच्याबरोबर कोणीही पोलीस किंवा सैनिक नव्हते. आम्ही फिरत होतो तेथून जवळची सैनिक चौकी पहलगामप्रमाणेच दहा किलोमीटर दूरवर होती. त्यामुळे पहलगामच्या पर्यटनस्थळावर पोलीस नसणे ही काही नवी गोष्ट नाही. फरक हा की, आजपर्यंत पाळली जाणारी लक्ष्मणरेषा यावेळी पाकिस्तानने आणि पाक दहशतवाद्यांनी पार केली आहे. अर्थातच या आगळिकीसाठी पाकिस्तानला धडा शिकवणारी कारवाई होणे गरजेचे आहे.

आता सिंधू जलसंधी निलंबित करून भारताने पाकिस्तानच्या मर्मावर घाव घातला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये हिमालयातले बर्फ वितळून सिंधू आणि इतर नद्यांमध्ये पाणी येते आणि त्यावरच पाकिस्तानची तहान भागते. सध्या भारताकडे चिनाब आणि झेलम नदीवर जलविद्युत प्रकल्प असून त्यात उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाणी साठून आपण पाकिस्तानमध्ये जाणारा ओघ कमी करु शकतो. याउलट, पावसाळ्यात पूर आले असताना साठवलेले अधिक पाणी सोडून तेथील पूरस्थिती आणखी गंभीर करू शकतो. गेल्या महिनाभरापासून काश्मीरला जोडणारा रेल्वेमार्ग तयार आहे. एकदा तो सुरू झाला की काश्मिरी लोकांची खूप सोय होणार आहे कारण त्यांच्याकडे होणाऱ्या फळे तसेच इतर उत्पादनाचा वाहतूक खर्च निम्म्यावर येणार आहे. अर्थातच त्यामुळे काश्मीरमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण होईल, यात शंका नाही. एकदा एखाद्या प्रदेशात आर्थिक सुबत्ता निर्माण झाली की तेथील लोक सहजसहजी हसाचाराला उद्युक्त होत नाहीत. पाकिस्तानला नेमकी हीच भीती सतावत आहे. म्हणूनच त्यांनी पहलगामची घटना घडवून आणली. गेल्या अनेक महिन्यांपासून गुप्तहेर संघटनांना याची कुणकुण आहे. त्यामुळेच तयार होऊनही श्रीनगरची रेल्वेसेवा सुरू करण्यात आलेली नाही. पाकिस्तानी अतिरेक्यांचा पूर्ण बिमोड केल्याखेरीज ही रेल्वेसेवा सुरू केली, तर त्यावर दहशतवादी हल्ले होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने पाकिस्तानमधील दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्याची संधी मिळाली आहे.

पाकिस्तानचा पंजाब प्रांत दहशतवादाची जननी आहे. पाणी तोडल्यामुळे सगळ्यात जास्त परिणाम पंजाबवर होणार आहे. आपल्या सैन्याने चालवलेल्या दहशतवादामुळे ही परिस्थिती झाली आहे, अशी जाणीव पाकिस्तानी पंजाबात होईल तेव्हा तेथील लोकच सैन्याविरुद्ध उठाव करतील. मात्र यासाठी भारताने उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे उघडपणे सांगण्याची वेळ आज आली आहे. असे झाल्यास आपल्या देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजल्यावर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल का, या प्रश्नाचे उत्तर मिळू शकेल.

# अजूनही महिला नेतृत्वाची गळचेपी..?



भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या हक्कांसाठी लढा दिला. २७ सप्टेंबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला त्यावेळी हिंदू कोड बिलाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, "समाजातल्या वर्गावर्गातली असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातली असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगारावर राजमहाल बांधण्यासारखे होय." याचा विचार देशातील प्रत्येक नागरिकांनी करणे आवश्यक आहे. तेव्हा राज्यात असो वा देशात अजूनही महिला नेतृत्वाची गळचेपी होताना दिसून येत आहे. ही पुरुषांची मानसिकता थांबणे गरजेचे आहे.

भारतीय राज्यघटनेमुळे आपल्या देशातील महिला देशाच्या राष्ट्रपती पदावर विराजमान जरी झाल्या तरी देशात अजूनही महिला नेतृत्वाची गळचेपी दिसतच आहे. काही ठिकाणी महिला नेतृत्व करीत असल्या तरी त्याचा कारभार नवरोबा किंवा पुरुष करीत असतात. मागील वीस ते पंचवीस वर्षांत बऱ्याच महिला गावच्या सरपंच आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष झाल्या. त्यावेळी सर्व कामे नवरोबा करायचे, एकदा नवरोबाच्या हातात फाईल दिली की काम झाले अशी चर्चा हॉटेल व बस डेपोत लोक एकत्र झाल्यावर बोलत असत. हे मी स्वतः एकले आहे. मग सांगा, महिला निर्णय कशी घेणार? तेव्हा महिलांनी सुद्धा सही बहाद्दर होऊ नये. आपण आपला हक्क मिळवावा. असे होताना अजूनही दिसत नाही. त्यामुळे याला जबाबदार कोण? याचे उत्तर आपणा सर्वांना शोधावे लागेल. तरच खऱ्या अर्थाने महिला स्वतःचा निर्णय स्वतः घेऊन सक्षम बनू शकतात.

रवींद्र तांबे

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या १८ फेब्रुवारी, २०२५ च्या परिपत्रकानुसार आपल्या महाराष्ट्र राज्यात ४४ राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्यात येत आहेत. त्याप्रमाणे राज्यातील विविध संस्था/मंडळे यांच्या वतीने विविध कार्यक्रमांनी जयंती महोत्सव साजरे केले जात आहे. दुःखाची बाब म्हणजे, मंडळाचे सभासद पुरुष असो वा महिला समान वर्गणी काढत आहेत. त्याच प्रमाणे काही मंडळी स्वतःहून मंडळाला आर्थिक मदत करीत असतात. अगदी कार्यक्रम ठरवल्यापासून कार्यक्रम होईपर्यंत महिला पदाधिकारी व सभासद उत्साहाने काम करतात. मात्र कार्यक्रमाच्या दिवशी महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नावे व त्यांचे फोटो मंडळाच्या बॅनरवर दिसत नाही. मग खरच महिलांचे सक्षमीकरण होणार का? महिला मंडळ नोंदणीकृत असून सुद्धा पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांची नावे व फोटो बॅनरवर दिसत नसतील, तर महिला मंडळ असून नसल्या सारखी आहेत. तेव्हा असे किती दिवस चालणार आहे. त्यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले होणे आवश्यक आहे. त्यांच्या तत्त्वांचे पालन करावे लागेल. त्यासाठी महिलांनी एकत्रित येऊन पुरुषांना धडा शिकविला पाहिजे. तरच महिलांना सन्मान मिळेल. सन २०२५ मध्ये सुद्धा पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात अशी परिस्थिती पाहायला मिळते, हीच खरी शोकांतिका आहे. म्हणजे अजूनही महिला स्वतंत्र झालेली दिसत नाही हे दुर्दैवाने लिहावेसे वाटते. तेव्हा महिलांनी एकत्र येऊन आपल्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही यासाठी लढा दिला पाहिजे. कारण आपण सावित्रीबाईंच्या लेकी आहोत. आम्ही आता रडणार नाही तर लढणार आहोत. बाबासाहेबांनी आम्हांला आमचे न्याय हक्क मिळवून दिले आहेत. त्यामुळे आपल्या देशातील महिला देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत जाऊन पोहोचली आहे. मंडळांच्या घटनेमध्ये मंडळाचे स्वतंत्र महिला मंडळ असावे असे असताना जर महिलांची नावे मंडळाच्या बोर्डवर छापली गेली नसतील, तर अशा विरोधात आवाज उठविला पाहिजे. कारण भारतीय राज्यघटनेने देशातील प्रत्येक महिलेला मूलभूत अधिकार दिले आहेत.

इतकेच नव्हे तर मंडळाच्या बैठकीच्या वेळी सुद्धा महिला पदाधिकारी यांना विचार पीठावर बसविले जात नाही. त्यांचा सन्मान केला, तर केला नाही तर आपल्या जवळच्या महिलांचा सन्मान करायचा आणि कार्यक्रम समाप्त करायचा. अशी पद्धत सध्या पाहायला मिळते. हे चित्र बदलणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने महिलांना न्याय मिळेल. महिलांना सन्मान मिळेल. यासाठी महिला मंडळांनी एकी दाखवावी. कारण एकीचे बळ ही गोष्ट आपणा सर्वांना माहीत आहे.

८ जुलै, १९४२ रोजी नागपूर येथे फेडरेशनच्या परिषदेच्या निमित्ताने महिला प्रतिनिधींसोबत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोलताना म्हणाले होते की, कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील खाण काम करणाऱ्या महिलांना प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिला कामगारांना पुरुषाप्रमाणे मजुरी देणे, मजूर व कष्टकरी महिलांसाठी एकवीस दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची भरपगारी हक्काची रजा, दुखापत झाल्यास पूर्ण नुकसान भरपाई, वीस वर्ष शासकीय सेवा केली असेल तर निवृत्तीवेतन, नोकरी करणाऱ्या महिलांना भर पगारी प्रसूती रजा अशा अनेक हक्काच्या सवलती त्यांनी भारतीय महिलांना मिळवून दिल्या आहेत. अशा सवलती मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशातील नव्हे, तर जगातील एकमेव पहिली व्यक्ती आहे.

त्यामुळे बाबासाहेब प्रत्येकांनी समजून घेतले पाहिजे. तेव्हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराप्रमाणे महिलांनी आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतःही पुढे यायला हवे. तरच अन्यायाला वाचा फुटेल आणि खऱ्या अर्थाने महिलांना न्याय मिळेल. म्हणजे राज्यात असो वा देशात महिला नेतृत्वाची गळचेपी थांबून खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण होईल.

## राशिभविष्य

शनिवार,०३ मे २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती वैशाख शुद्ध षष्ठी शके १९४७ . चंद्र नक्षत्र पुनर्वसु. योग शूल,चंद्र राशी मिथुन ६.३६ पर्यंत नंतर पुष्य,भारतीय सौर १३ वैशाख शके १९४७ म्हणजेच शनिवार दिनांक ३ मे २०२५ .मुंबईचा सूर्योदय ६.९, मुंबईचा सूर्यास्त १९.१, मुंबईचा चंद्रोदय ११.१५, मुंबईचा चंद्रास्त ००.५५ उद्याची, राहू काळ ९.२२ ते १०.५९, गंगा सप्तमी, गंगा पूजन,श्री नृसिंह नवरात्र प्रारंभ, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष** : आर्थिक मदतीची विचारणा होऊ शकते.

**वृषभ** : कुटुंबात मंगल कार्याचे नियोजन होईल

**मिथुन** : मान्यवरांच्या ओळखीत वाढ होईल

**कर्क** : काही आश्चर्यकारक घटना घडतील.

**सिंह** : कायदेविषयक कार्य गतीमान होतील.

**कन्या** : जोडीदाराचे म्हणणे बरोबर ठरेल.

**तूळ** : अचानक धनलाभ होऊ शकतो.

**वृश्चिक** : जबाबदाऱ्या वाढतील.

**धनू** : वाद-विवाद टाळलेले चांगले.

**मकर** : इतरांच्या म्हणण्याला प्राधान्य द्या.

**कुंभ** : कुटुंबातील समस्या आपण सोडवाल.

**मीन** : दिवस आनंदात जाईल.

## जनसंवाद

### राज्य सरकारने तातडीने पाऊले उचलणे गरजेचे...

काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानद्वारा आतंकी हल्ल्यानंतर केंद्र सरकारद्वारा कूटनीती स्तरावर पाकिस्तान विरुद्ध विविध महत्त्वाचे निर्णय घेतले आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे सरकारने सिंधू पाणी करार रद्द केला आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच पाकिस्तानच्या विरुद्ध एवढा मोठा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारद्वारा घेतला गेला आहे. याद्वारा पाकिस्तानचा आर्थिक कणा मोडला जाणार आहे. आज देशातील प्रत्येक मेट्रो सीटी म्हणा की मोठी शहरे म्हणा या प्रत्येक शहरात मिनी पाकिस्तान, बांगला देश तयार झाले. या ठिकाणी अनधिकृतरीत्या भारतात प्रवेश केलेल्या मायनर रोहिंग्या मुसलमान आणि बांगलादेशातील मुसलमानांनी सरकारी जागेवर अतिक्रमण करून आपल्या अनधिकृत वस्त्या उभारलेल्या आहेत. यामध्ये सगळे गैर धंदे चालतात ही बाब जगजाहीर आहे. या रोहिंग्या, बांगला देशीकडे आपल्याकडील रहिवाशांसाठी आवश्यक असणारे सरकारी अधिकृत कागदपत्रे जसे आधारकार्ड, रेशनकार्ड आहे. याशिवाय यातील गंभीर बाब म्हणजे बहुतांश कडे भारताचे अधिकृत मतदान कार्ड असल्याचे बोलले जाते. बेकायदेशीर रोहिंग्या, बांगलादेशातील मुसलमानांमुळे प्रत्येक शहरातील लोकसंख्येचे प्रमाण बदलत चालले आहे. एकेकाळी टक्केवारीने बहुसंख्य असणारा समाजाची तेथील टक्केवारी झपाट्याने कमी होत आहे. कारण बेकायदेशीर तसेच गैरमार्गाने बांगलादेशातून येणाऱ्यांची संख्या इतकी प्रचंड आहे त्या मानाने त्या विरुद्ध होणारी सरकारी कारवाई नाही म्हणाला आहे.

– **अविनाश देशपांडे**, पुणे

### तूही जात कन्ची ?

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही 'सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे' इत्यादी म्हटले आहे. जनगणनेचे काम जेव्हा प्रत्यक्ष क्षेत्रात करण्यात येईल, त्या वेळी प्रत्येक व्यक्तीला स्वतःची खरी जात सांगावी लागेल. राहुल गांधी यांनी वेळोवेळी प्रसारमाध्यमांसमोर, ते स्वतः दत्तात्रेयगोत्री ब्राह्मण असल्याचे सांगितले आहे आणि ते रेकॉर्डवर आहे. ज्यांचे वडील पारशी आणि आई ख्रिश्चन, ते दत्तात्रेयगोत्री ब्राह्मण कसे, त्या वेळी संपूर्ण देशाला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी कधीही दिले नाही. आता त्यांना ते द्यावे लागेल. म्हणजे महात्मा गांधींचे आडनाव लावणारी व्यक्ती सत्य बोलते की असत्य, ते देशाला समजेल.

– **अविनाश वाघ**, पुणे

### जात जनगणना देशहितासाठी असावी

केंद्रीय मंत्रिमंडळाने जातीय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. २०११ साली शेवटची जनगणना झाले होती. जातीय जनगणनेने देशाची सामाजिक रचना कशी आहे याचे चित्र स्पष्ट झाल्यास कोणावर अन्याय न करता योग्य दिशेने निर्णय घेऊन विकास साधता येईल. या निर्णयामुळे सर्व आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास वर्ग सक्षम होण्यास मदत होईल. विविध समुदायांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे योग्य मूल्यांकन करता येईल. हा निर्णय केवळ निवडणुकांपूर्ती नसावा. या निर्णयाचे फायदे जे अधिकारापासून वंचित राहिले आणि ज्यांना लाभ मिळाला नाही त्या सर्व वंचितांना लाभ मिळावा. जातनिहाय जनगणनेची आकडेवारी मिळाल्यास लोकसंख्येनुसार आरक्षणाची मर्यादा ठरवता येईल. तसेच सधन किंवा प्रगत झालेल्या नागरिकांना आरक्षणाच्या लाभातून वगळता येईल. समाजात दुरावा निर्माण करण्याचा आणि राष्ट्रीय एकात्मता विस्कळीत करण्याचा या जात जनगणनेचा उद्देश नसावा.

– **विवेक तवटे** , कळवा, ठाणे

### काय ही व्यवस्था आणि कायदे?

माथाडीपुढे बांगलादेशी कामगारांचे संकट या बातमीने संताप झाला. त्यांची घुसखोरी खपवून तर घेताच आणि पुन्हा आपल्या कामगारांची रोजी रोटी खेचून घेऊन त्यांचं पोट भरता! काय ही व्यवस्था आणि कायदे? बांगलादेशात आजही भारतीयांचे काय हाल केले जाताहेत याचा विसर पडला? आजही अवैधरित्या भारतात घुसलेले करोडो बांगलादेशी आहेत. पोलीस कारवाईत त्यातील हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच हाती लागतात अशी आपली यंत्रणा आहे. त्यांना आश्रय देणारे, शासकीय कागदपत्रे मिळवून देणारे देशद्रोही अजूनही कां पकडले जात नाहीत? धर्मांध, हिंसक, गुन्हेगारी उपजत प्रवृत्ती असलेली ही जमात भारतीयांचे छोटे-मोठे उद्योग धंदे हस्तगत करून शिरजोर झाले आहेत हे वरील वस्तुस्थिती वरून स्पष्ट होत आहे. शासन काय करील याची वाट न पाहता प्रत्येक भारतीयाने सावध होणे काळाची गरज आहे.

– **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर.

### पोलिसांची प्रतिमा मलिन नको

महाराष्ट्रात नेमके काय चालले आहे काहीही समजायला मार्ग नाही. राज्याच्या मुख्य पदी म्हणजे मुख्यमंत्री पदी भाजपाचे देवेंद्र फडणवीस आहेत. राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम व कर्तव्य म्हणून पोलिसांचे असते. विशेष म्हणजे राज्यातील पोलीस देखील इतर राज्यापेक्षा अधिक चांगल्या क्षमतेने कर्तव्य बजावत आहेत. इतके सारे असून देखील सत्तेवर असलेला एक आमदारानी, तर आपल्याच पोलिसांवर अतिशय खालच्या स्तरावर व गंभीर आरोप कालपर्यंत केले होते. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यानी पोलिसांच्या बाबतीत केलेल्या त्यांच्या त्या आक्षेपार्ह आणि बेजावबदार विधानासाठी लागलीच त्यांनी जाहीर दिलगिरी देखील व्यक्त केली आहे. पोलिसांमुळेच तर गुन्हेगारी आटोक्यात आहे. एवढेच काय तर लोकप्रतिनिधींना सुरक्षा देणे पोलिसांचे कर्तव्य आहे. पण संजय गायकवाडसारख्या जवाबदार नेत्यांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर आणि निष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आरोप केल्यामुळेच पोलिसांची वर्दी अपमानित होत होती. पोलिसांचे मनोबल खचणार नाही आणि कुठलाही परिस्थितीत पोलिसांची प्रतिमा मलिन होणार नाही याची काळजी घ्यायला हवी, असे वाटते.

– **संजय साळगांवकर,** कुर्ला,मुंबई

# श्रीलंका ब्रॉडकास्टिंग स्टेशनची सफर



श्रीलंकेला जाताना मी अतिशय उत्साही होते. कारण लहानपणी ज्या रेडिओ स्टेशनवरून मी बिनाका गीतमाला ऐकण्याचा आनंद घेतला ते रेडीओ स्टेशन मला प्रत्यक्ष पाहण्याचा योग येणार होता! आपले पूर्वीचे रेडिओ सिलोन म्हणजेच आताचे श्रीलंका ब्रॉडकास्टिंग स्टेशन.

प्रत्यक्ष रेडिओ स्टेशन पाहिले, तर त्याची इमारत एका मोठ्या बैठ्या बंगल्यासारखी होती. समोर पद्मासनात बुद्धाची पांढरी शुभ्र मूर्ती होती. अपॉइंटमेंटप्रमाणे बरोबर नऊ वाजता रेडिओ स्टेशनमधील हिंदी डिपार्टमेंटच्या निवेदिका सुभाषिणी मॅडम यांची भेट झाली. त्यांनी आम्हाला रेडिओ स्टेशन पाहायला नेले. इमारतीच्या लांबलचक कॉरिडॉरमध्ये आपल्या हिंदी सिनेमातील जुन्या संगीतकारांचे, गायकांचे फोटो लावले होते. तसेच त्यात श्रीलंकेच्या प्रसिद्ध संगीतकारांचेही फोटो होते. सुभाषिणी मॅडम आम्हाला एक स्टुडिओ बघायला घेऊन गेल्या. ते एक ऑडिटोरियमच होते. तिथून संगीताचे लाईव्ह कार्यक्रम प्रसारित केले जातात. त्या रंगीबेरंगी स्टुडिओमध्ये वादक तालमीची तयारी करत होते. कारण थोड्याच वेळात संगीताचे एक लाईव्ह प्रसारण सुरू होणार होते.

मी सुभाषिणी यांना बिनाका गीतमालेचे लोकप्रिय निवेदक अमीन सयानी कोणत्या स्टुडिओत रेकॉर्डिंग करत होते तो पाहायला मिळेल का असे विचारले. त्या म्हणाल्या, "अमीन सयानी तर रेडिओ सिलोनला कधी आलेच नव्हते. तो कार्यक्रम मुंबईत रेकॉर्ड करून त्याचे स्पुल्स आमच्याकडे येत असत. ते स्पुल्स आम्ही इथे वाजवीत होतो." मग हा कार्यक्रम मुंबईतूनच प्रसारित का होत नव्हता हा प्रश्न मी विचारला. त्या म्हणाल्या, "चला लायब्ररीमधे बसूया. मी तुम्हाला सर्व इतिहास सांगते." त्या आमच्याशी हिंदीत बोलत होत्या.





ती लायब्ररी म्हणजे रेकॉर्ड्सची (ध्वनिमुद्रिका) लायब्ररी होती. चारही भिंती रेकॉर्ड्सनी व्यापल्या होत्या. सुमारे २६००० पेक्षा अधिक रेकॉर्ड्स् तिथे आहेत. जी गाणी भारतातल्या आकाशवाणी केंद्रांवर मिळणार नाहीत तीसुद्धा आमच्याकडे उपलब्ध आहेत, असे त्या सांगत होत्या. रेडिओ सिलोन हे सिलोनवर ब्रिटिशांचे राज्य असताना १९२५ साली ब्रॉडकास्टिंग स्टेशन म्हणून सुरू झाले. तसे प्रयोग म्हणून १९२३लाच येथून प्रसारण करून पाहिले होते. प्रयोग यशस्वी झाल्यावर १६ डिसेंबर १९२५ पासून हे स्टेशन प्रसारणासाठी रीतसर सज्ज झाले. श्रीलंकेचे नाव तेव्हा सिलोन होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर लगेचच म्हणजे १९४९ साली सिलोनलाही स्वातंत्र्य मिळाले. रेडिओ सिलोन हे कॉर्पोरेशनच्या अधिपत्याखाली आले व १९६७ साली त्याचे नाव सिलोन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (CBC) झाले. आज या केंद्रातून सिंहली, तमिळ आणि इंग्रजी भाषेतून कार्यक्रम प्रसारित होतात. त्यावेळी या आकाशवाणीसाठी वेगळे मंत्रिपद नव्हते. सिलोन ब्रॉडकास्टिंग डिपार्टमेंट हे पोस्टमास्तरांच्या अधिकार क्षेत्रात होते. आता १९७२ सालापासून म्हणजे सिलोनचे नाव श्रीलंका झाल्यापासून हे रेडिओ केंद्र श्रीलंका ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन(SLBC) झाले.

मात्र या रेडिओवरून हिंदी भाषेतील प्रसारण कसे सुरू झाले त्याची एक कथा आहे. भारतात १९५०च्या सुमारास चित्रपट निर्मित भरात आली होती. चित्रपट प्रदर्शित करण्यापूर्वी त्याच्या गाण्यांची प्रसिद्धी करणे हे निर्मात्यांचे धोरण होते. कारण गाण्यांमुळे लोक चित्रपटाकडे आकृष्ट होत असत. पण तेव्हाचे सांस्कृतिक मंत्री बी. व्ही. केसकर यांनी आकाशवाणीवरून सिनेसंगीत प्रसारित न करण्याचा नियम आणला होता. केवळ लोकगीते, भजने व अभिजात शास्त्रीय संगीत प्रसारित व्हावे व आपली संस्कृती टिकून राहावी अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे चित्रपटसंगीताची गळचेपी होऊ लागली. भारतातील या घडामोडींवर श्रीलंकेतील आकाशवाणीचे अधिकारीही लक्ष ठेवून होते. त्यांचे शॉर्टवेव्हमधील प्रसारण संपूर्ण हिंदुस्तानात ऐकू येत असे. त्यामुळे भारतातील चित्रपट क्षेत्रातील लोकांनी रेडिओ सिलोनकडे मोर्चा वळवला. सर्व ग्रामोफोन रेकॉर्डस् निर्माते रेडिओ सिलोनला त्यांच्या नव्या रेकॉर्डस् पाठवू लागले. रेडिओ सिलोनला गाण्यांच्या प्रसारणासाठी जाहिरातीही मिळू लागल्या. त्यावेळच्या मद्रासमधील एका जाहिरात कंपनीचे प्रमुख हरिहरन यांनी भारतातून जाहिराती मिळवून त्या सिलोनला पाठवायला सुरुवात केली. रेडिओ सिलोनवर जाहिरातींचा व्याप खूप वाढला. या विभागात काम करणाऱ्या माणसांना दिवसाचे तास आणि मिनिटे कमी पडू लागली. प्रसारणात जागोजाग जाहिरातीचा स्पॉट लावावा लागे. त्यासाठी तज्ज्ञ मंडळींचे एक वेगळे डिपार्टमेंटच उभारण्यात आले. या जाहिरात सेवेच्या बदल्यात श्रीलंकेला पैसे मिळत नसत. पण या सेवेच्या बदल्यात श्रीलंकेला अशोक लेलँडकडून मोफत बसेसचा पुरवठा होऊ लागला. अर्थात, भारतातील जाहिरातदार अशोक लेलँडला या बसेसचे पैसे देत असत. १९५२ साली बिनाका टूथपेस्टच्या निर्मात्यांनी 'बिनाका गीतमाला' सुरू केली. त्यात हिंदी गाण्यांची लोकप्रियतेनुसार क्रमवारी ठरत असे. अमीन सयानींसारखे उत्तम निवेदक लाभल्यामुळे हा कार्यक्रम अधिकच लोकप्रिय होत होता.

इकडे भारतात आकाशवाणीवरून सिनेसंगीत वाजणे बंद झाल्यामुळे आकाशवाणीची लोकप्रियता कमालीची घसरली. तेव्हा भारत सरकारने सिनेसंगीतावरील बंदी उठवली. त्यामुळे श्रीलंकेतून शॉर्ट वेव्हवरून प्रसारित होणारा 'बिनाका गीतमाला' कार्यक्रम बंद होऊन भारतातून मीडियम वेव्हवरून 'सिबाका गीतमाला' या नावाने प्रसारित होऊ लागला.




फिरता फिरता

मेघना साने

सुभाषिणी मॅडमनी सांगितले की, आता श्रीलंका ब्रॉडकास्टिंग स्टेशनवरून दोन मुख्य सेवा दिल्या जातात. एक राष्ट्रीय (National) आणि दुसरी व्यावसायिक (Commercial). दोन्ही सेवा या सिंहली, तमिळ व इंग्रजीत उपलब्ध आहेत. याशिवाय, श्रीलंकेतील मुलांची शैक्षणिक प्रगती व्हावी या दृष्टीने शाळेतील शिशु ते माध्यमिक तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा अनेक चांगले उपक्रम रेडिओवरून राबवले जात आहेत. तसेच ते इंटरनेट रेडिओवरही ऐकता येतात. रेडिओ सिलोन म्हणजेच आताचे श्रीलंका ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन ही एक नॅशनल इन्स्टिट्यूशनच झाली आहे.

meghanasane@gmail.com





# समीक्षा कालातीत नसते...

मागील लेखामुळे एका नाटकाच्या सादरकर्त्यांमध्ये माझ्या नाट्यनिरीक्षणाबाबत थोडी नाराजी व्यक्त झाली. नाराजी, लिखाणातल्या मतांवर होती. नाटक जन्माला आले की ते मुरू द्यावे व नंतर चाखावे असे एक ढोबळ विधान केले जाते व ते मी माझ्या लेखात केलेही होते. मुरणे म्हणजे प्रयोग होऊ देणे. त्यामुळे नाटक "सेट" होण्यास मदत होते. मग माझा प्रश्न असतो की, नाटकाच्या तालिमी कशासाठी करायच्या? माझी समजूत अशी होती की, तालमीमध्ये नाटक सेट होते आणि रंगीत तालीम हा थिएटरमधला प्रयोगच असतो, मात्र विना प्रेक्षक तांत्रिक टिमने ती केलेली चाचपणी असते. आज हे मी आपल्याशी का शेअर करतोय कारण या शिष्टाचाराचे स्वरुपच बदलून गेलेय. पहिले किमान पाच प्रयोग हे म्हणे समीक्षकांसाठी नसतातच. चांगले लिहायचे झाल्यास नाटकाचा खरा परफॉर्मन्स पाचाच्या पुढल्या प्रयोगांमध्ये दिसतो आणि समीक्षकाने आता चांगले लिहीले तरच त्या नाटकाला लोकाश्रय मिळतो. या एकंदर थिअरीचं काही कळेनासच झालंय. तरी बरं मी माझ्या लिखाणाला "निरीक्षण" म्हणतो, असो तर या नाट्यपरीक्षणावर खास वाचकाग्रहास्तव लिहावे म्हणतो.

मुळात समीक्षेमुळे अथवा समीक्षा वाचून हल्लीचे प्रेक्षक नाटक बघायला जातात हीच मुळात अंधश्रद्धा आहे. बायका रेसिपी वाचून नेहमीच्या डिशमधे बदल करतील किंवा नव्याने त्या लिखित कतीनुसार बदल करतील परंतु पेपरातील सो कॉल्ड नाटकाची स्टोरी सांगितलेली परीक्षणं वाचून त्या नाटकाला जाण्याची सुतराम शक्यता नसते. जनरली मराठीच नव्हे, तर इतर भाषिक नाटके चालतात ती नट नट्यांच्या नावावर. लेखक, दिग्दर्शक वगैरे जंत्री फार पुढची गोष्ट असते. आज मला विजय केंकरेंचे नाटक बघायचे आहे असे म्हणून कुणीही नाटक बघायला जात नाही. एखादा दिग्दर्शक त्या बघितल्या जाणाऱ्या नाटकामुळे प्रेक्षकांच्या "वाट्यास" येतो ज्यास योगायोगाने गवसलेला दिग्दर्शक म्हणावे लागते. सर्वसाधारणपणे नाटकाच्या जाहिरातीतील कॅची लाईन्समुळे प्रेक्षक भुलतो. उदा. ४०-५० वर्षांच्या प्रदीर्घ गॅपनंतर अमक्या तमक्याचे पुनरागमन किंवा शेवटचे दहा प्रयोग किंवा प्रयोग क्रमांक २५ असला तरी "पनवेलमधे आज नाटकाचा शुभारंभ" या असल्या मजकुराला प्रेक्षक कायम बळी पडतं आलाय. नाटक चालवण्याची ती क्लुप्ती आहे, मात्र याची पोलखोल समीक्षकानी करायची म्हटली की, त्याच्या नावाने लाखोली वाहायला सुरुवात करायची, ही हल्ली वाचकांना लागलेली सवयच आहे. जाहिरात हेच नाटक प्रमोशनचे मुळ केंद्र आहे. त्यातील समीक्षेमुळे होणारा प्रपोगंडा प्रचंड दुर्लक्षित झालाय. कारण समीक्षा लिहिणारे समीक्षच उरलेले नाहीत. मी तर माझ्या लेखात नाटकाची स्टोरीच सांगतो किंवा माझा लेख म्हणजे माझ्या पेपरात "जागा भरो आंदोलनाची" भूमिका बजावतो. या अविर्भावामुळे नाटक नावाचा व्यवसाय ओढगस्तीला लागला असावा. प्रेक्षक चांगल्या समीक्षा वाचू न शकल्याने नाटकाकडे फिरकत नसावेत असा भाबडा समज मी करुन घेतलाय. म्हणून मग समीक्षा म्हणजे काय ते सांगावेसे वाटतेय, ते सांगतो...!



भालचंद्र कुबल

पाचवा वेद

नाट्यसमीक्षेची संज्ञा व्यापक आहे. नाटकाची समीक्षा संहिता आणि प्रयोग अशा पातळीवर होत असते. साकल्याने नाट्य हे संहितालक्ष्यी समीक्षेच्या व्यापकतेने अधिक सुदृढ आणि परिपक्वतेकडे जाणारी असली तरी प्रयोगलक्ष्यी समीक्षा परीपूर्णत्वाकडे नेत असते. यासंदर्भात अनेक समीक्षकांची मत-मतांतरे आहेत. नाट्यसमीक्षा केवळ नाटकाच्या समीक्षेची नसावी तर ती नाट्यप्रयोगाचीही असावी यासंदर्भात व. दि. कुलकर्णी म्हणतात, नाट्यसमीक्षा ही समीक्षेच्या जातीतील एक वेगळी जाती आहे. ते पुढे म्हणतात, नाट्यसंहितेतील प्रत्येक शब्दांबरोबर त्या प्रत्येक शब्दांइतकेच रंगमंचावरील त्याच्या अवतरणाच्या तपशिलाला कलादृष्ट्या समान महत्त्व असते हे संपूर्णपणे जाणणारे दोघेच असतात. एक दिग्दर्शक, दुसरा समीक्षक! माधव मनोहर याविषयी म्हणतात, नाटक हे दृश्य काव्य असले तरी नाट्यसंहितेची दृश्यता ही अल्पकालिक असते, तर मूळ संहितेची महत्ता चिरकालिक असू शकते. नाटकाचा प्रयोग तात्कालिक असतो, तर नाटक कालातीत असू शकते.

हे लय म्हंजे लयच सैद्धांतिक बोललो राव...! कोणी बघितलीय ती समीक्षा ? ती बाई आहे, चेटकीण आहे की गाढवीण? सद्यस्थितीतील नाटके या समीक्षेच्या वाटेलाच जात नाहीत. त्यामुळे नवी पिढी विचारणारच ना ? की समीक्षा कुठल्या गाढवीणीचे नाव आहे म्हणून?

# बिंदास कुहूच्या भूमिकेत जाई

जाई खांडेकर अभिनयाच्या क्षेत्रात हळूहळू आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. 'भूमिका' या नाटकात ती सचिन खेडेकर व समिधा गुरू यांच्या मुलीची भूमिका साकारीत आहे.

भांडुपच्या पवार पब्लिक स्कूलमध्ये तिचे शालेय शिक्षण झाले. तिथे सांस्कृतिक कार्यक्रमात तिला जास्त भाग घेता आला नाही. नंतर तिने सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. तिथे तिने इतिहासामध्ये पदवी घेतली. मल्हार या फेस्टिवलमध्ये तिचा सक्रिय सहभाग होता त्या वेळी ती त्या कार्यक्रमाची वीसीपी होती. एथका या थिएटर फेस्टिवल मध्ये तिने भाग घेतला होता. होप्स नावाच्या एकांकिकेचे लेखन व दिग्दर्शन तिने केले. चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित मन शुद्ध तुझं या मालिकेमध्ये तिने काम केले.



टर्निंग पॉइंट

युवराज अवसरमल

भूमिका या नाटकातील एका पात्रासाठी तिची निवड झाली. या नाटकातील तिच्या भूमिकेविषयी विचार असता ती म्हणाली की, या नाटकात माझी कुहू नावाच्या मुलीची भूमिका आहे. मी आधुनिक विचाराची आहे. ती नवीन पिढीची प्रतिनिधित्व करते. ती बिंदास आहे. ती आताच्या प्रश्नावर बोलणारी आहे. सचिन खेडेकर व समिधा गुरुची ती कन्या दाखविली आहे. हे नाटक माझ्या जीवनातील टर्निंग पॉइंट आहे.

ती या नाटकाचे सारे श्रेय दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णींना देते. त्यांनी मोठ्या अभ्यासाने तिचे मूव्हमेंट बसविले आहेत. त्यांनी दिलेल्या विश्वासमुळेच ती ही भूमिका यशस्वीरीत्या साकारू शकली. सचिन खेडेकर व समिधा गुरु हे अनुभवाने तिच्यापेक्षा सीनियर आहेत; परंतु त्यांच्यामध्ये मित्रत्वाचे नाते निर्माण झाले आहे. त्यांच्यामध्ये चांगला रेपो निर्माण झाला आहे. रंगमंचावरचा वावर, संवादफेक ही त्यांना पाहून, त्यांचे मार्गदर्शन मिळून ती शिकली.

सध्या प्रेक्षकांच्या चांगल्या प्रतिक्रिया तिला या नाटकातील भूमिकेविषयी मिळत आहे. एक कलाकार म्हणून घडण्याची प्रक्रिया तिच्यामध्ये सुरू आहे. वेगवेगळ्या चांगल्या भूमिका साकारण्याची तिची इच्छा आहे. वेगवेगळ्या चांगल्या दिग्दर्शकाकडे काम करण्याची देखील तिची इच्छा आहे. भूमिका नाटकासाठी व भविष्यातील वाटचालीसाठी तिला हार्दिक शुभेच्छा!





जाई खांडेकर




मराठी रंगभूमी अनेकदा साचेबद्ध नेपथ्यात अडकलेली दिसते; मात्र आता तिच्या नाट्यावकाशात थेट 'कोर्टरूम' दृष्टीस पडणार आहे. कारण बऱ्याच कालावधीनंतर रंगभूमीवर 'कोर्टरूम ड्रामा'ची एन्ट्री होत आहे. 'गंगा यमुना सरस्वती' असे या नवीन नाटकाचे शीर्षक आहे. पुण्यात १ मे रोजी शुभारंभ झालेल्या या नाटकाचा मुंबईतला शुभारंभाचा प्रयोग शनिवार, ३ मे रोजी यशवंत नाट्यमंदिरात होत आहे. 'गंगा यमुना सरस्वती' या नाटकाचे लेखन राजन मोहाडीकर यांनी केले आहे. या नाटकाची मूळ संकल्पना पुरुषोत्तम बेर्डे यांची असून त्यांनीच या नाटकाचे दिग्दर्शन, नेपथ्य आणि वेशभूषा केली आहे. शीतल तळपदे यांनी या नाटकाची प्रकाशयोजना केली आहे. रसिका वेंगुर्लेकर, बाळ धुरी, सुनील जाधव आदींसह एकूण १४ कलाकारांच्या या नाटकात भूमिका आहेत.

'गंगा यमुना सरस्वती' या नाटकाविषयी बोलताना दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे म्हणतात, "रसिकांना खुर्चीला खिळवून ठेवेल असे हे नाटक आहे. नाटककार राजन मोहाडीकर यांना मी या नाटकाची संकल्पना ऐकवली, तेव्हा ती त्यांना आवडली. या नाटकातून आम्ही एक प्रकारचा निष्कर्ष काढला आहे आणि तो रसिकांना नाटक पाहिल्यानंतर समजेल. या नाटकातल्या मुख्य भूमिकेसाठी रसिका वेंगुर्लेकरची आम्ही निवड केली आणि आता तिने या नाटकातल्या भूमिकांचा ताबा घेतला आहे. बाळ धुरी यांचे कास्टिंग अगदी पहिल्यापासूनच कन्फर्म होते. काही महिन्यांपूर्वी मला साहित्य संघाचा पुरस्कार मिळाला, तेव्हा ते तिथे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहून मी त्यांना म्हटले होते की, पुढेमागे मी कलाक्षेत्रात जेव्हा काही करीन, तेव्हा आपण एकत्र काम करू आणि हा योग या नाटकाच्या निमित्ताने जुळून आला. नाटकासाठी सध्या चार-पाच कलाकारांच्या पुढे कोणी जात नाही; परंतु आमच्या नाटकात १४ कलाकार आहेत आणि एकूण २६ भूमिका आहेत. अनेक वर्षांनंतर असे खटलेबाज नाटक रंगभूमीवर आले आहे".



राजरंग

राज चिंचणकर

या नाटकात मध्यवर्ती भूमिका साकारणारी रसिका वेंगुर्लेकर म्हणते, "सात वर्षांनंतर मी पुन्हा एकदा नाटक करत आहे. माझी सुरुवात नाटकातूनच बालकलाकार म्हणून झालेली आहे. त्यामुळे नाटकावर माझे विशेष प्रेम आहे. नाटक ही फार मोठी कमिटमेंट असते आणि त्यासाठी स्वतःला पूर्णतः वाहून घ्यावे लागते. तो सगळा योग या नाटकाच्या निमित्ताने जुळून आला आहे. गेली दोन वर्षे मी नाटकाच्या शोधात होते. त्यासाठी अनेक स्क्रिप्ट वाचल्या. जेव्हा मला पुरुषोत्तम बेर्डे यांनी या नाटकाविषयी सांगितले आणि स्क्रिप्ट दिली, तेव्हा ती मला खूप आवडली. या नाटकातली माझी भूमिका खूप सशक्त आणि इंटरेस्टिंग आहे. पुरुषोत्तम बेर्डे सरांसारख्या दिग्गज दिग्दर्शकांबरोबर यानिमित्ताने मला काम करता येत आहे. हे नाटक म्हणजे कोर्टरूम ड्रामा आहे आणि मी यात एका वकिलाची भूमिका करत आहे. नाटकाचा विषय सामाजिक आहे; मात्र खूप सिरीयस पातळीवर न जाता इंटरेस्टिंग पातळीवर जाणारे हे नाटक आहे. लोक स्वतःलाच या नाटकात पाहतील, कारण आपल्या आजूबाजूला घडणारा हा विषय आहे आणि त्याविषयी फारसे बोलले गेलेले नाही. तर असा एक विषय घेऊन आम्ही आलो आहोत. रसिकांना हे नाटक नक्कीच आवडेल".



ज्येष्ठ रंगकर्मी बाळ धुरी या नाटकाच्या निमित्ताने तब्बल २१ वर्षांनंतर पुन्हा एकदा रंगभूमीवर येत आहेत. त्याबद्दल त्यांना विचारले असता ते म्हणतात, "चंद्रलेखा नाट्यसंस्थेचे 'पहाटवारं' हे नाटक सन २००४ मध्ये मी केले होते. त्यानंतर आता २१ वर्षांनी मी पुन्हा नाटकात काम करत आहे. मधल्या काळात माझे सिनेमे आणि मालिका सुरू होत्या. परंतु नाटकातल्या माणसाला नाटक केल्याशिवाय चैन पडत नाही. मी आतापर्यंत टॉपच्या २४ दिग्दर्शकांबरोबर नाटकांमध्ये काम केले आहे. दारव्हेकर मास्तर, विजया मेहता, अरविंद देशपांडे आणि पुढच्या पिढीतले चंद्रकांत कुलकर्णी, विजय केंकरे यांच्या दिग्दर्शनाखाली मी नाटक केले आहे. पुरुषोत्तम बेर्डेंकडे मात्र मी काम केले नव्हते. इच्छा फार होती, पण योग येत नव्हता. या नाटकाच्या निमित्ताने तोही जुळून आला. आता पुरुषोत्तम बेर्डे माझे पंचविसावे दिग्दर्शक ठरले आहेत".

या नाटकात एक महत्त्वाची भूमिका रंगवणारे अभिनेते सुनील जाधव सांगतात, "मी या नाटकात सरकारी वकिलाची भूमिका करत आहे. थोडासा विसरभोळेपणा असलेला वकील मी यात सादर करतोय. हे पात्र लोकांच्या पसंतीस उतरेल, असा मला विश्वास आहे. आमचे दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे कलाकारांना मोकळीक देत असतात; त्यामुळे आम्हाला हवे तसे आम्ही काम करतो. पण त्यांना काही पटले नाही, तर ते स्पष्टपणे सांगतात. आमच्या नाटकात बाळ धुरी यांच्यासारखे ज्येष्ठ रंगकर्मी आहेत आणि मला त्यांच्यासोबत काम करायला मिळत आहे, हे माझे भाग्य आहे".

# 'शातिर The Beginning' या मराठी चित्रपटाचा टीजर प्रदर्शित

'शातिर The Beginning या मराठी चित्रपटाचा टीजर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला आहे. 'करायला अट्टल गुन्हेगारांची "खातीर"... घेऊन आलो आहोत, जबरदस्त शातिर...!!! अशा हटके टॅग लाईनमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या संवेदनशील विषयावर बेतलेला, सस्पेन्स थ्रीलर 'शातिर The Beginning ' आजच्या तरुणाईची कथा सांगणारा असल्याचे टीजर मधून दिसते. हा चित्रपट येत्या २३ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

शातिर The Beginning या चित्रपटाची निर्मिती श्रीयांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्स या बॅनरखाली रेश्मा वायकर यांनी केली असून या चित्रपटाद्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. 'शातिर The Beginning ' च्या टीजर वरून दिसते की, हा आजच्या तरुणाईची कथा सांगणारा चित्रपट असून कॉलेज तरुणाई मध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थाच्या व्यसनांवर भाष्य करणारा असल्याचे दिसतो. पोलिसांवर हल्ला करून पसार झालेला ड्रग्ज माफिया कोण? पोलीस या ड्रग्ज माफियाचा शोध घेण्यात यशस्वी ठरणार का? आणि नायिकेची या सर्व प्रकरणात भूमिका नेमकी काय? हे जाणून घेण्याची उत्कंठा चित्रपटाचा टीजर वाढवतो. चित्रपटाबद्दल बोलताना दिग्दर्शक सुनील वायकर म्हणाले, शातिर The Beginning माझा दिग्दर्शक म्हणून पाहिलाच प्रयत्न आहे. समाजातील अमली पदार्थाच्या सेवनामुळे होणारी व्यसनाधीनता आणि त्यामुळे वाढणारी गुन्हेगारी त्या विरुद्धचा कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा लढा या चित्रपटातून दाखवून एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या चित्रपटात रेश्मा वायकर या प्रमुख भूमिकेत असून त्यांच्यासह योगेश सोमण, रमेश परदेशी, अनिल नगरकर, अभिमन्यू वायकर, वेद भालशंकर, ॲड. रामेश्वर गिते, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.



# आदित्य पॉलिटेक्निकमुळे ज्ञानात भर!

बोंबला

## शैक्षणिक:सिवेज ट्रीटमेंट प्लांटला भेट

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:आदित्य पॉलिटेक्निक च्या विद्यार्थांना सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक भेट दिली. यावेळी जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची काय भूमिका आहे. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर काय परिणाम होतात. हे विद्यार्थी समजून घेतले. पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन आणि प्रक्रिया या बद्दल विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती घेतली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयाचे पी. डी. दुधाळ, जी. एम. खालापुरीकार, ए.आर. मुंडे, आर.एस. वरपे यांची उपस्थिती होती.



पर्यावरण विज्ञान, स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यास करणारे विद्यार्थी वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक संकल्पनांचा व्यावहारिक उपयोग प्रत्यक्षपणे पाहण्यासाठी असा शैक्षणिक अभ्यास भेटीचे आयोजन केले जाते. द्रव यांत्रिकी, सूक्ष्मजीवशास्त्र आणि रासायनिक अभिक्रियांचे तत्व वास्तविक जगात कसे वापरले जातात याची संपूर्ण माहिती या भेटीत विद्यार्थ्यांना मिळाली. सांडपाणी प्रक्रियेमधील आधुनिक आणि कार्यक्षम पद्धतीचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. ज्यामध्ये स्क्रीनिंग, ग्रिट काढून टाकणे, ड्इठ बेसिनमध्ये जैविक उपचार आणि निर्जंतुकीकरण. सांडपाणी प्रक्रियांचे महत्त्व: जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांनी समजून घेतली. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर होणारे परिणाम विद्यार्थी समजून घेतले.

कांचनवाडी एसटीपीमध्ये दररोज १६१ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता आहे. ज्यामुळे नवी मुंबईतील एसटीपी वगळता ते पान २ वर

### परिक्षेत्र भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान दिले जाते. आपण जे शिकलो आहोत. ते जर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समोर दिसले अनुभवता आले. प्रत्यक्ष कृतीतून शिकता आले तर त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होते. सिवेज ट्रीटमेंट प्लांटला विद्यार्थ्यांनी दिलेल्या भेटीमुळे पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन प्रक्रिया त्यांना पूर्ण पणे समजली. निरीक्षण केल्याने विद्यार्थ्यांना खाम नदी सारख्या जलसाठ्यात सोडण्यापूर्वी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती मिळाली. ही माहिती त्यांना भविष्यात उपयुक्त ठरणार आहे.

–डॉ. राहुल खडके, प्राचार्य
आदित्य पॉलीटेकनिक, बीड

# आगे परिवाराचे दुःख हे माझेही

## पंकजा मुंडे:न्याय मिळवून देण्यासाठी कोर्टापर्यंत लढू



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव:राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. आगे परिवाराचे दुःख हे माझे दुःख आहे, एक चांगला कार्यकर्ता आपण गमावला आहे. आगे परिवाराला न्याय मिळवून देण्यासाठी गरज पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत लढा देऊ अशा शब्दांत धीर देत ना. पंकजाताईंनी आगे यांच्या आई, पत्नी व मुलीची जबाबदारी घेतली. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या मदतीचा धनादेश यावेळी आगे परिवाराला देण्यात आला.

भाजपचे जिल्हा विस्तारक स्व बाबासाहेब आगे यांची काही दिवसापूर्वी हत्या झाली होती. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे, अजूनही या दुःखातून ते सावरले नाहीत. मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे बीड पान २ वर

# ...कर्मचाऱ्यांचेही मोठे योगदान

## महेश महाजन:परळी वीज केंद्रात महाराष्ट्र दिन



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:येथे कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित दिनांक १ मे महाराष्ट्र दिनी कार्यक्रमात बोलताना प्रभारी मुख्य अभियंता महेश महाजन ध्वजारोहणानंतर बोलतांना म्हणाले की, महाराष्ट्राच्या विकासात औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील कर्मचाऱ्यांचे हे मोठे योगदान आहे. शाश्वत विकासासाठी वीज निर्मिती अत्यंत महत्त्वाची आहे. त्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले कार्य तत्परतेने पार पाडावे असे आव्हानही केले.

या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता एस. एन. बुकतारे, प्रसन्नकुमार गरुड,धनंजय कोकाटे, राजीव रेड्डी, सुरेश गर्जे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे,महादेव वंजारे ,सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरने , सुरक्षा विभागाचे प्रमुख बी आर अंबड , कार्यकारी अभियंता मदन पवार, रत्नाकर देवांग, संदीप बारगजे, व्यंकटराव रामोड, के एच गित्ते मॅडम आदी प्रमुख उपस्थिती होते.

# परळी पत्रकारांकडून यथोचित सन्मान!



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: शहरात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्थेसह आरोग्याचे ठिकाणं अत्याधुनिक होत आहेत.

आज शनिवार दि. ३ मे रोजी परळी येथील डॉ. पांडूरंग फड यांच्या हॉस्पीटलच्या उद्घाटनप्रसंगी त्यांना महात्मा जोतीबा फुले लिखीत गुलामगिरी हे पुस्तक देऊन स्वागत करतांना पत्रकार धनंजय आरबुने, फुले-आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे,संपादक नितीन ढाकणे, संपादक बालासाहेब फड, डॉ. उमेश मुंडे, बँक मॅनेजर गणेश गुट्टे छायाचित्रात दिसत आहेत.

# कन्हेरवाडी झेडपी शाळेला पुस्तके भेट!

## धोरण:सुजित तांबेंच्या सामाजिकतेचे कौतूक

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील कन्हेरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या बाल वाचनालयास कन्हेरवाडी येथील भुमी पुत्र लालासाहेब जाधव यांचे जावई कवी, लेखक आणि शिवव्याख्याते सुजित नामदेव तांबे यांनी लिहिलेले शिवछत्रपती सुत्र विश्वासाचे हे अतिशय सुंदर व स्वलीखीत असलेले पुस्तक महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लालासाहेब जाधव यांनी त्या पुस्तकाच्या दोन प्रती कन्हेरवाडी येथील शिव छत्रपती वाचनालय तर ग्रा.प कार्यालय दोन प्रती आणि जि.प.प्राथमिक शाळेला दहा प्रती सरपंच ड. रामराजे जाधव,लालासाहेब



जाधव, पत्रकार रामराजे जगताप, प्रगतशील शेतकरी विक्रम कवडे, पांडुरंग जाधव यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करुन पुस्तके भेट दिली आहेत यावेळी जि.प.प्रा शाळेकडून लालासाहेब जाधव यांचा जाहीर सत्कार करुन या उपक्रमाचे कौतुक केले यावेळी मुख्याध्यापक बी. एन भंडारे आणि सहशिक्षक दिपक चाळक यांनी लालासाहेब जाधव यांचे कौतुक करत शाळेत राबविण्यात येत असलेले विविध उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता व एकंदरीत शालेय कामकाजाबद्दल माहिती दिली तसेच पान २ वर

# पोनि मोहन राठोड सेवानिवृत्त

## ऋणानुबंध: तलवाडा पोलीस ठाण्यात सत्कार

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन येथे कार्यरत आसलेले पोलिस उपनिरीक्षक मोहन राठोड यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम तलवाडा पोलीस स्टेशनच्या वतीने आयोजित करण्यात आला होता पोलिस उपनिरीक्षक मोहन राठोड, सह पत्नी यांचा सत्कार, सपोनि सोमनाथ नरके उपनिरीक्षक स्वापनिल कोळी यांच्या हस्ते सत्कार सोहळा संपन्न झाला पोलिस उपनिरीक्षक मोहन राठोड यांनी ३७ वर्ष महाराष्ट्र पोलीस खात्यात एक चांगल्या प्रकारे नोकरी केली आहे. यावेळी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे जिल्हाध्यक्ष आल्ताफ भाई कुरेशी, लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे, तलवाडा पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता



# शॉर्टसर्किटमुळे शेतीचे मोठे नुकसान

## दुर्घटना: महावितरणचा गलथान कारभार



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:शहरालगत असलेली राऊतवस्ती परिसरात मंगळवारी दुपारी शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत नगरसेवक आसाराम ( बाबुराव ) जाधव यांच्या शेतात मोठे नुकसान झाले. महावितरणच्या झुकलेल्या विद्युत तारांमुळे शॉर्टसर्किट होऊन ही आग लागली असल्याची माहिती आहे.या आगीत कडबा, ज्वारी व इतर वैरणीचा साठा पूर्णतः जळून खाक झाला असून, एक म्हैस गंभीर जखमी झाली आहे. शेतमालाचे व जनावरांचे पान २ वर

# लोणार सरोवर येथे 'काळा कस्तुर' पक्षी

## पर्यावरण:दुर्मिळ पक्षी म्हणून नोंद



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:आज सकाळी हा दुर्मिळ पक्षी धारातीर्थ लोणार येथील एका पिंपळाच्या झाडावर सकाळी ८ वाजता आढळून आला आहे महाराष्ट्र पक्षीमित्र जिल्हा प्रतिनिधी सचिन कापुरे सकाळी पक्षी निरीक्षण करत असताना त्यांना हा वेगळा पक्षी दिसुन आला त्यांनी त्याचे निरीक्षण केले वेगळा असल्याने त्याला कॅमेरात कैद करून महाराष्ट्र पक्षी मित्र संघटनचे अध्यक्ष जयंत वडतकर व पक्षीमित्र मनोज बिंड यांना मोबाईल वर या पक्षाची माहिती विचारली असता त्यांनी या पक्षाची माहिती सांगितली व हा पक्षी दुर्मिळ असून याचे नाव इंडियन ब्लैक बर्ड आहे व या भागात सहसा दिसत नाही असे सांगितले. पान २ वर

मनोरंजन

## अभिजात मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा

# भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय!

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला.या कार्यक्रमात मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.त्यामुळे मराठी मनोरंजनाला एक नवे दालन खुले झाले आहे.



एआय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही मायबोली अभिमानाने उभी राहावी,यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे.जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे. यावेळी मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले ,मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे.असे मत उदय सामंत यांनी व्यक्त केले.'अभिजात मराठी' चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले 'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ असून'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार आहे.

# मटका बुक्यां चालवणारा खराडे कोण?

## सवाल:पोलीस प्रशासन कारवाई का करत नाहीत




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील अनेक गावांमध्ये मटका बुक्यांचा सुळसुळाट झाला आहे यांचा मास्टर माईंड गणेश खराडे नावाचा व्यक्ती असल्याचे समजले जाते आहे कारण मटका बुक्यांचा सर्व आकडेवारी गणेश खराडे नावाचा व्यक्ती घेत असल्याचे समजले जाते आहे कारण केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये विचारणा केली तर गणेश खराडे याचे नाव नागरिकांन मधुन व्यक्त केले जात आहे मग मटका बुक्यां चालवणारा खराडे